

## 'रिपाइं'च्या वतीने ६०० पूरग्रस्तांना शिधावाटप

**पुणे :** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पुणे शहराच्या वतीने पूरग्रस्तांना शिधावाटप करण्यात आले. पावसामुळे शेकडो कुटुंबाचे मोठे नुकसान झाले होते. त्यांना मदतीचा हात देण्यासाठी 'रिपाइं' शहराच्या वतीने पुढाकार घेण्यात आला. पक्षाच्या कार्यालयात शेकडो कुटुंबांना ही मदत सुपूर्त करण्यात आली. ताडीवाला रोड, शांतीनगर, येरवडा, बोपोडी, दापोडी, खडकी परिसरातील जवळपास ६०० पूरग्रस्त कुटुंबांना शिधावाटप करण्यात आले. यामध्ये पाच किलो गहु, दोन किलो तांदूळ, साखर, शेंगदाणे, मुग डाळ, पोहे एक किलो, मसाला, मीठ, हळद, फरसाण, गोडेतेल आदी जीवनावश्यक वस्तूंचा समावेश आहे. यावेळी 'रिपाइं'चे प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव, शहराध्यक्ष संजय सोनवणे आदी उपस्थित होते.



> पूरग्रस्त बांधवाना काहीसा दिलासा देण्यासाठी हे शिधावाटप केले जात आहे. या कुटुंबांचे जीवन पूर्वपदावर येण्यासाठी आवश्यक ती सर्व प्रकारची मदत करण्याचा प्रयत्न पक्षाच्या वतीने करत आहोत."
> — बाळासाहेब जानराव

### पुणे शहरात विविध ठिकाणी उत्साहात साजरी

# जनजागृतीपर संदेश युक्त दही हंडी



## कृष्ण जन्मोत्सवानिमित्त बापूसाहेब पवार शाळेत नृत्याचे सादरीकरण

**पुणे :** भवानी पेठेतील बापूसाहेब पवार प्राथमिक शाळेत गोकुळअष्टमी निमित्त कृष्णजन्मोत्सव व दहीहंडी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी कृष्णजन्मोत्सवानिमित्त अनेक नृत्य आणि विविध सादरीकरणाचे आयोजन केले होते. शाळेतील बालचमू राधाकृष्णाची वेशभूषा करून आले होते. कृष्ण जन्मसोहळा साजरा करून शाळेत दहीहंडी शाळेतील इ. ३ री च्या विद्यार्थ्यांनी गोविंदा रे गोपाला हे नृत्य सादर करून फोडली. श्रीकृष्णजन्माची माहिती फिलोमिना कसने यांनी सांगितली. कार्यक्रमासाठी पुण्यश्लोक जिजामाता शिक्षण मंडळाचे श्रीयुत संकेत व छोटा कान्हा शिवांश आवर्जुन उपस्थित होते.

शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना प्रसाद म्हणून सुंठवडा, व काल्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे नियोजन रोझमेरी पारगे व कामिनी शेंगाळे यांनी केले. मुख्याध्यापिका हेमलता कुऱ्हाडे यांनी कार्यक्रमाचे मार्गदर्शन केले.



### जेधे सोशल वेलफेअर फाऊंडेशन व इंद्राणी बालन फाऊंडेशनतर्फे १०० सायकलचे गरजूंना वाटप

## बालगोपाळांची अभिनव 'सायकल दहीहंडी'

**पुणे :** श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारी... हाथी घोडा पाल की, जय कन्हैयालाल की... गोपालकृष्ण भगवान की जय... याचा जयघोष करत ढोलताशाच्या गजरात बालगोपाळांनी अभिनव अशी सायकल दहीहंडी फोडली. जेधे सोशल वेलफेअर फाऊंडेशन व इंद्राणी बालन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार पेठेतील जेधे मॅन्शन, पंचमुखी मारुती मंदिर येथे या अभिनव सायकल दहीहंडीचे आयोजन केले होते.

बालगोपाळांनी ही अभिनव सायकल दहीहंडी फोडून आनंदोत्सव साजरा केला. या सायकल दहीहंडीतील १०० सायकलींचे मावळ तालुक्यातील करंजगाव, ब्राम्हणवाडी, मोरमारेवाडी, पालेनामा या अतिदुर्गम भागातील, तसेच पुणे शहर परिसरातील गरजू मुलामुलींना मोफत वाटप करण्यात आले. यावेळी सायकलींच्या मधोमध क्रेनला बांधलेली दहीहंडी सर्वांचेच लक्ष वेधून घेत होती. रुद्रांग वाद्यपथक (ट्रस्ट), वज्र युवा मंच या दोन पथकांनी बहारदार ढोलवादन केले.

उद्योजक पुनीत बालन, अतिरिक्त पोलीस आयुक्त प्रवीण पाटील, माजी गृहराज्यमंत्री रमेश बागवे, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसचे उपाध्यक्ष माजी आमदार मोहन जोशी, संयोजक कान्होजी दयानंद जेधे, गौरव बोराडे, रोहन काळभोर सामाजिक कार्यकर्ते शिरीष मोहिते, वैभव वाघ, उमेश सपकाळ आदी यावेळी उपस्थित होते.

प्रवीण पाटील म्हणाले, "अतिशय विधायक पद्धतीने सण, उत्सव साजरा करण्याची ही पद्धत मला भावली. ग्रामीण भागातील या बालगोपाळांच्या चेहऱ्यावरील सायकल मिळाल्याचा आनंद सुखावणारा आहे."

मोहन जोशी म्हणाले, "संपूर्ण पुण्यात ही एकमेव सामाजिक दहीहंडी आहे, ज्यातून समाजहिताचा विचार होतो. यामध्ये पुनीत बालन यांनी घेतलेला पुढाकार स्तुत्य आहे. जेधे सोशल वेलफेअर फाऊंडेशन अंतर्गत दरवर्षी साजऱ्या होणाऱ्या दहिहंडीतून समाजातील मुलांना कसा फायदा होतो याचा विचार केला जातो."

कान्होजी जेधे म्हणाले, "दरवर्षी काही नवीन करण्याचा आमचा ध्यास असतो. या उपक्रमातून आपण समाजाला कशी मदत करू शकू, याकडे जास्त कल असतो. गेल्यावर्षी अभिनव खेळणी दहीहंडीतुन एक हजारपेक्षा अधिक खेळणी गरजू मुलांना देण्यात आले होते. यंदा सायकल हंडीतून दुर्गम भागातील मुलांच्या प्रवासाचा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला आहे."



> आजवर इंद्राणी बालन फाऊंडेशनतर्फे पुणे, सातारा व अन्य जिल्ह्यातील १२ हजार विद्यार्थ्यांना सायकल वाटप करण्यात आले. दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना अभ्यास आणि क्रीडा क्षेत्राशी निगडित ज्ञान मिळण्यास वेळ मिळावा, हा यामागचा उद्देश आहे. यंदा या अभिनव सायकल दहीहंडीच्या माध्यमातून १०० सायकलींचे वाटप केले असून, पुढील वर्षी या उपक्रमात ५०० सायकलींचे वाटप होईल."
> — पुनीत बालन

### राष्ट्रपुरूषांच्या चरित्र पुस्तकांसह

## विद्यार्थ्यांची 'पुस्तकहंडी' उपक्रम

**पुणे :** 'श्रीकृष्ण जयंती', गोपाळकाला' व देशाच्या प्रजासत्ताकाचे अमृत महोत्सवी वर्ष याचे औचित्य साधत सोमवार पेठेतील दि रास्ता पेठ एज्युकेशन सोसायटीच्या आबासाहेब अत्रे मराठी माध्यम शाळेतील विद्यार्थ्यांनी ग्रंथालयातील 'बालसाहित्यकार इंदिरा अत्रे वाचनकक्षा'त 'राष्ट्रपुरुषांच्या चरित्र पुस्तकांची पुस्तकांची हंडी' हा उपक्रम साजरा केला.

छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, महात्मा फुले, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, पं. नेहरू, नेताजी सुभाषचंद्र बोस, सरदार पटेल, पं. लालबहादूर शास्त्री, राजर्षी शाहू महाराज, भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर अशा लोकोत्तर राष्ट्रपुरुषांची चरित्रात्मक पुस्तके यांचा समावेश 'पुस्तक हंडी' उपक्रमात करण्यात आला होता. उपक्रमाची संकल्पना संदर्भ ग्रंथपाल व माहितीतज्ज्ञ प्रसाद भडसावळे यांची होती.



यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी 'राष्ट्रनायकांच्या विचारांचे सादरीकरण करत देशाच्या उज्वल भविष्यासाठी 'चांगले विचार, आचार व वाचन करण्याचा' संकल्प केला.

## अभिनवमध्ये 'स्त्री-सुरक्षा' दहीहंडी

**पुणे :** 'स्त्रीयांवर वाढत जाणारे अत्याचार कमी होऊन, समाजात स्त्रीयांना ताठ मानेने सुरक्षित जीवन जगता यावे यासाठी सर्वांनी एकरूप झाले पाहिजे" असा संदेश देत अभिनवमध्ये विद्यार्थिनींनी दहीहंडी फोडली. आंबेगावच्या अभिनव एज्युकेशन सोसायटीच्या इंग्लिश मिडीयम स्कूल आणि जुनिअर कॉलेजमध्ये प्राथमिक, माध्यमिक आणि जुनिअर कॉलेजच्या विद्यार्थिनींमध्ये दहीहंडी फोडण्याची स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये माध्यमिक विभागाच्या ब्ल्यू हाऊसच्या तर ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थिनींनी ताकद, धेय्य, धैर्य दाखवत उत्साहात दहीहंडी फोडली. विद्यार्थिनींनी स्वतः बनवलेल्या स्त्री सूरक्षेसंदर्भात "स्त्री आहे, जीवनाचा आधार, द्या तिला योग्य मानसन्मान "सावित्रीच्या लेकी आम्ही आता नाही नमणार, डोईवरचा पदर आता कमरेला खोचणार' अशा घोषवाक्याद्वारे जनजागृती केली.



दहीहंडीचा उत्सव साजरा करण्याचे मुख्य कारण म्हणजे दहीहंडी फोडताना विद्यार्थ्यांना समता, बंधुभाव, एकाग्रता, संघभावना, वेळेचे नियोजन, इत्यादी गोष्टींचे महत्त्व समजावे हे होते.

### आयुक्तांच्या आदेशाला केराची टोपली

## रुग्णांची वाढ आणि अधिकाऱ्यांमध्ये राजकारण

**पुणे :** महापालिकेच्या आरोग्य विभागात आयुक्त राजेंद्र भोसले यांनी खांदेपालट केली असली तरी सहाय्यक आरोग्य अधिकाऱ्यांना त्यांच्याकडे असलेला 'भार' सोडायचा नाही. आयुक्तांनी दिलेल्या खांदेपालटाच्या 'डोस' ला सहाय्यक अधिकाऱ्यांनी पत्र ,आजार व रजा याची मात्रा वापरण्यास सुरुवात केली आहे.

गेल्या आठवड्यात आयुक्त भोसले यांनी आरोग्य विभागातील सहाय्यक आरोग्य अधिकाऱ्यांच्याकडे असलेल्या विभागांची अदलाबदल केली होती. दहा वर्षांहुन अधिक काळ या विभागांची जबाबदारी या संबंधित सहाय्यक आरोग्य अधिकाऱ्यांकडे होती. तर काही आरोग्य अधिकारी हे केवळ नावापुरतेच काम करीत होते. पालिका आयुक्त भोसले यांनी केलेल्या खांदेपालटामुळे सहाय्यक आरोग्य अधिकाऱ्यांची निर्माण झालेली एकाधिकारशाही ही मोडीत निघणार होती.

आयुक्तांनी काढलेल्या आदेशाला अधिकाऱ्यांकडून केराची टोपली दाखविण्याची तयारी सुरु झाली आहे.

#### हा 'भार' सोडवेना; अधिकारी गायब

- शहरात डेंग्यु, चिकनगुणिया आदी आजाराचे प्रमाण वाढले आहे. याविषयाकडे राजकीय पक्षांकडून लक्ष वेधले जात आहे. त्याचवेळी आरोग्य विभागातील अधिकाऱ्यांमध्ये राजकारण रंगले आहे. अधिकारी चक्क गायब असण्याचे प्रमाण वाढले आहे. शहरी गरीब योजना, नर्सिंग होम परवानगी, औषध भांडार, राज्य आणि केंद्र सरकारच्या योजना आदी विभाग हे नेहमीच चर्चेचे ठरत आहे. याच भोवती हे राजकारण फिरत आहे.

#### तर कारवाई करू : आयुक्त

- आरोग्य अधिकारी चार्ज देण्यास तयार नाहीत याविषयावर आयुक्त भोसले म्हणाले, "महापालिका आयुक्तांनी आदेश दिल्यानंतर चार्ज सोडणे दुसऱ्याने घेणे असे काही नसते. चार्ज काढले की दुसऱ्याकडे जातात. चार्ज सोडले नाही तरी एकतर्फी चार्ज काढून घेता येतात. चार्ज न सोडल्यास कारवाई करू. कोणी फाईल घरी नेल्या असल्यास त्याची तपासणी केली जाईल.

### "पीआयसीटी अभियांत्रिकी महाविद्यालयात

## बहुविद्याशाखीय शिक्षणाच्या अंमलबजावणीवर कार्यशाळा

**पुणे :**येथील पुणे इन्स्टिट्यूट ऑफ कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी (PICT) या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या संगणक विभागात बहुविद्याशाखीय शिक्षणाची अंमलबजावणी कशी करावी यावर विशेष कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेचे आयोजन महाविद्यालयाचे संचालक डॉ. पी. टी. कुलकर्णी आणि प्राचार्य संजय गंधे यांच्या मार्गदर्शनाखाली, विभाग प्रमुख डॉ. गीतांजली काळे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. प्रा. रजनी जाधव आणि प्रा. वैशाली कांडेकर यांनी या कार्यशाळेत मोलाचे सहकार्य केले, तर प्रा. माधुरी माने यांनी समन्वयक म्हणून जबाबदारी पार पाडली. या कार्यशाळेत डॉ. सुजाथा वरदराजन यांनी बहुविद्याशाखीय शिक्षणाची अंमलबजावणी कशी करावी यावर विशेष सत्र घेतले आणि कॉम्प्युटर इंजिनिअरिंगमध्ये याची अंमलबजावणी कशी करावी याबाबत मार्गदर्शन केले.

## विद्यापीठातील १११ पदांवर भरती प्रक्रियेसाठी शासनाची मान्यता

**पुणे :** विद्यापीठाच्या प्रभारी कुलसचिव डॉ. ज्योती भाकरे यांनी प्राध्यापक भरतीची जाहिरात संकेतस्थळावर प्रसिद्ध केली आहे. विद्यापीठातील १११ पदांवर भरती प्रक्रियेसाठी राज्य शासनाने मान्यता दिली होती. मात्र तांत्रिक अडचणींमुळे ही भरती प्रक्रिया रखडली आहे. तसेच अधिष्ठाता, नवोपक्रम संचालक, कुलसचिव अशी पदेही अतिरिक्त कार्यभाराने चालवली जात आहेत. रिक्त जागांमुळे शैक्षणिक, प्रशासकीय कामकाज करणे अवघड होत आहे. प्राध्यापकांना अध्यापनासह दोन-तीन जबाबदाऱ्या पेलाव्या लागत आहेत. या पार्श्वभूवीर कंत्राटी भरती राबवण्याचा निर्णय घेतला आहे.



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील शैक्षणिक विभागांतील सहायक प्राध्यापकांच्या १३३ जागांसाठी कंत्राटी भरती प्रक्रिया राबवली जाईल. या पदावर निवड होणाऱ्यांना ३१ मे २०२५ पर्यंत काम करता येणार आहे. इच्छुक उमेदवारांना २७ ऑगस्टपासून ऑनलाइन अर्ज करता येईल. विज्ञान व तंत्रज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन विद्या शाखा, मानव्य विज्ञान विद्याशाखा आणि आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा विद्याशाखांअंतर्गत शैक्षणिक विभागांतील पदे भरली जाणार आहेत. स्पर्धा परीक्षा केंद्रासाठी चार पदे, विद्यापीठाच्या नाशिक केंद्रामधील व्यवस्थापनशास्त्र विभागाच्या चार पदांचाही समावेश आहे. १३३ पदांसाठीची ही प्रक्रिया आरक्षणनिहाय राबवली जाणार आहे. या पदांसाठी उमेदवारांना २७ ऑगस्ट ते ५ सप्टेंबर या कालावधीमध्ये ऑनलाइन अर्ज करता येणार आहेत.

## लवकरच शिवाजीनगर एसटी बस स्थानकाची उभारणी - आ. शिरोळे

**पुणे :** शिवाजीनगर एसटी बसस्थानक उभारणीसाठी महामेट्रो आणि एसटी महामंडळ यांच्यातील करार अंतिम टप्प्यात आला असून येत्या तीन वर्षांत बस स्थानकासह तेथे भव्य संकुल उभारण्यात येणार असल्याची माहिती छत्रपती शिवाजीनगर मतदार संघाचे आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी कळविली आहे. यासंदर्भात विधानसभेत लक्षवेधी सूचना मांडून गेल्या वर्षी शिरोळे यांनी या प्रश्नाला वाचा फोडली होती. त्यानंतर दोन्ही विभागाच्या अधिकाऱ्यांशी अनेक बैठका घेत या समस्येतून त्यांनी मार्ग काढला या संदर्भातच शिरोळे यांनी नुकतीच महाराष्ट्र मेट्रो रेल कोऑपरेशन लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांची भेट घेतली. महामेट्रोच्या जनसंपर्क आणि प्रशासन विभागाचे कार्यकारी संचालक हेमंत सोनवणे हे देखील यावेळी उपस्थित होते.

सिद्धार्थ शिरोळे म्हणाले, "देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना याबाबतचा आराखडा तयार करण्यात आला होता. मात्र महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर अडीच वर्षाच्या काळात त्या संदर्भात काहीही हालचाली झाल्या नाहीत. महायुती पुन्हा सत्तेत आल्यानंतर उपमुख्यमंत्री फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे मी याबाबत वेळोवेळी पाठपुरावा केला. आता पीपीपी तत्त्वावर हा प्रकल्प उभारण्यात येणार आहे.

## २९ ऑगस्टपर्यंत आरटीई प्रवेशाची संधी

**पुणे :** विद्यार्थी व पलकन साथी एक सांगली गोष्ट आहे. शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत (आरटीई) २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रियेत प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. आता २९ ऑगस्टपर्यंत प्रवेशाची संधी मिळणार असून, यानंतर पुन्हा मुदतवाढ दिली जाणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. प्रवेश प्रक्रियेत सोमवारी रात्रीपर्यंत ६१ हजार १५७ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला होता. त्यामुळे ४४ हजारांहून अधिक जागा रिक्त असल्याचे दिसून येत आहे.

प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी ही माहिती दिली. प्राथमिक शिक्षण संचालनालयातर्फे आरटीई प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येत आहे. यंदा राज्यातील ९ हजार २१७ शाळांमध्ये १ लाख ५ हजार २४२ जागा प्रवेशासाठी उपलब्ध आहेत. त्यासाठी दाखल झालेल्या २ लाख ४२ हजार ५१६ अर्जातून ९३ हजार ९ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला. प्रतीक्षा यादीत ७१ हजार २७६ विद्यार्थ्यांचा समावेश होता. सुरुवातीला २३ ते ३१ जुलै या कालावधीत प्रवेशासाठी संधी दिल्यानंतर आणखी दोनवेळा मुदतवाढ देण्यात आली होती. सोडतीद्वारे प्रवेश जाहीर झालेल्या विद्यार्थ्यांनंतर प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी देण्याचा निर्णय घेण्यात आला. प्रतीक्षा यादीतील २३ हजार ८५० विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी २६ ऑगस्टपर्यंतची मुदत देण्यात आली होती. आता ही मुदत २९ ऑगस्टपर्यंत वाढवण्यात आली आहे.

# बेपत्ता महिलांचे काय?

महिलांवरील अत्याचार हा अक्षम्य अपराध आहे. तो करणाऱ्यांना मदत करू नका. सरकारे येतील आणि जातील, पण महिलांची सुरक्षा करणे हे आपले कर्तव्य आहे. पीडित महिला, मुली या घरातूनच 'ई-एफआयआर' दाखल करू शकतात. केंद्र सरकार अत्याचार रोखण्यासाठी दक्ष असल्याचे सांगत अत्याचार करणाऱ्यांविरोधात सरकार कठोर कायदे करणार असल्याची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जळगावला 'लखपती दीदी' संमेलनात केली. महिलांवर अत्याचार करणारे नराधम माफीला पात्र नाहीत. अशा घटनेतील आरोपींवर कडक कारवाई झाली पाहिजे. मी प्रत्येक राजकीय पक्ष आणि राज्य सरकारला सांगू इच्छितो की, महिलांवर होणारे अत्याचार अक्षम्य आहेत. कोणीही दोषी असेल त्याला कडक शिक्षा झाली पाहिजे. कोणीही आरोपीला पाठीशी घालण्याचे प्रयत्न करू नयेत. महिलांवर होणाऱ्या अत्याचाराच्या प्रकरणात दोषीला शिक्षा देण्यासाठी राज्य सरकारसोबत केंद्र सरकारसुद्धा खांद्याला खांदा लावून उभे असेल असेही पंतप्रधान म्हणाले. महिलांवरील अत्याचाराविरोधात कडक कायदे करू असे सरकार सांगत असले तरी वरचेवर अत्याचार वाढतच चालले आहेत. ते पाहून अत्याचाराविरोधातील कायदे कशासाठी असा प्रश्न पडतो. राज्यातील मुली व महिला बेपत्ता होत आहेत ही अतिशय चिंतेची अन् गंभीर बाब आहे. बेपत्ता मुली व महिला यांच्या संरक्षणाची जबाबदारी राज्य सरकारची आहे याचे भान ठेवा, अशा शब्दांत खंडपीठाने राज्य महिला आयोग आणि रेल्वे पोलिसांना खडसावले आहे. दरवर्षी असंख्य मुली आणि महिला बेपत्ता होण्याचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. अशा बेपत्ता महिलांचे पुढे काय होते, याचे उत्तर ना समाजाला मिळते ना त्यांच्या कुटुंबियांना. विवाहाचे आश्वासन देत पळवून नेलेल्या काही महिलांना आखाती देशात नेऊन तिथे त्यांना गैरकृत्ये करण्यास भाग पाडल्याच्या अनेक घटना आतापर्यंत उघडकीस आल्या आहेत. अनेक महिलांशी तर रीतसर विवाह करून नंतर त्यांना परदेशात शरीरविक्रय करण्याच्या रॅकेटमध्ये गोवण्यात आले, तर घरकामासाठी नेऊन महिलांचे शोषण करण्यात आल्याच्या घटनाही काही कमी नाहीत. दिशाभूल करून अथवा फूस लावून पळवलेल्या मुलींचा वापर अनैतिक, बेकायदेशीर कृत्ये करण्यासाठीही केला जाऊ शकतो. काही मुली विवाह करण्यासाठी घरातून पळून गेल्याचे आढळत असले तरी मोठ्या प्रमाणात अशा महिलांचा थांगपत्ता लागत नसल्याने रेकॉर्डवर त्या कायमच 'मिसिंग' म्हणून नोंदल्या जातात. कालांतराने त्यांचा ठावठिकाणा शोधण्याचे काम पोलिसांकडून थांबवले जाते. त्या महिलेच्या चारित्र्यावर बोट ठेवत शोधकामाची जबाबदारी कशी झटकता येईल, याकडेच पोलिसांचा कल असतो आणि हेच आक्षेपार्ह आहे. बहुतेक वेळा हत्या अथवा अपहरण अशा शक्यता लक्षात घेऊन तपास केला जात नाही. या संवेदनशील विषयाबाबत राज्य आणि केंद्र सरकारही गंभीर नसल्याचे दिसून येते. वर्षभरापूर्वी देशभरातून बेपत्ता झालेल्या मुलींची आकडेवारी गृहमंत्रालयाने संसदेत ठेवली होती. ही आकडेवारी धक्कादायक होती. २०१९ ते २०२१ या तीन वर्षांच्या काळात देशभरात दहा लाखांहून अधिक सज्ञान तर अडीच लाख अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्याचे सभागृहात मांडण्यात आले होते. त्यात महाराष्ट्रातील एक लाख ७८ हजार महिला आणि १३ हजार मुलींचा समावेश होता. बेपत्ता लहान मुले-मुली, तरुणी आणि महिलांचा शोध घेणे हे राज्य सरकारचे कर्तव्यच आहे. अर्थात बेपत्ता महिलांची ही आकडेवारी केवळ रेकॉर्डवरील आहे. कागदोपत्री नोंद न झालेल्या प्रकरणांची आकडेवारी वेगळीच असेल! बेपत्ता मुली आणि महिलांचा शोध घेण्यासाठी आतापर्यंत काय पावले उचलली गेली आणि मानवी तस्करी रोखण्यासाठी राज्याच्या पोलिस महासंचालकांनी रेल्वे पोलिसांमार्फत कोणत्या उपाययोजना केल्या याची माहिती देण्याचे निर्देश उच्च न्यायालयाने नुकतेच राज्य सरकारला एका याचिकेदरम्यान सुनावणी करताना दिले आहेत. मानवी तस्करी हा आंतरराष्ट्रीय स्तरावरचा गहन प्रश्न आहे. त्यासाठीचे जाळे विविध देशांमध्ये विणले गेले आहे. नोकरीच्या आमिषामुळे गरजू महिला त्यात अलगद अडकतात. कुटुंबियांचा आधार नसलेल्या महिला अशा रॅकेटमध्ये सहज फसतात. या महिलांना संबंधित व्यक्तीने झिडकारले तर त्या वाममार्गाला जाऊ शकतात. त्यामुळे बेपत्ता मुलींचा, महिलांचा प्रश्न ही एक सामाजिक समस्या आहे हे सरकारने मान्य करून अशा प्रकरणांची तड लावणे अपेक्षित आहे. महिला आणि मुली बेपत्ता होण्यामागे केवळ प्रेम प्रकरणच आहे असा निष्कर्ष काढणेही चुकीचे आहे. त्यामागे इतर समस्याही असू शकतात. बालविवाह, कौमार्य चाचणी, बळजबरीने गर्भपात, हुंडाबळी, अंधश्रद्धेचे बळी असेही काही प्रश्न त्यामागे असू शकतात. बेपत्ता मुली आणि महिलांची संख्या वेगाने कमी करणे हे सरकारचे ध्येय असायला हवे आणि त्यासाठी प्रभावी यंत्रणा उभी करण्याची तयारी ठेवावी लागेल. महिलांवरील अत्याचाराविरोधात कडक कायदे करू अशी आश्वासने देण्यात काही अर्थ नाही. अत्याचारी घटनांना पायबंद घालण्यासाठी पोलिस आणि अन्य सुरक्षा यंत्रणांनी अतिशय जागरूकता दाखवत अत्याचार करणाऱ्यांना आपला धाक पोहोचू शकेल असा दरारा निर्माण करणे आवश्यक आहे. नुसते कायदे करून उपयोग नाही, कायद्याविषयी प्रबोधन व धाकही हवा. कायद्याचा धाकच राहिलेला नसल्याने विकृत लोकांची हिंमत वाढत चालली आहे. महिलांशी छेडछाड, असभ्य वर्तन, अत्याचार, अनैतिक कृत्ये केल्याने होणाऱ्या परिणामांची जाणीवच नसल्याने या विकृती मोकाट सुटल्या आहेत. त्यासाठी कायदेविषयक प्रबोधन समाजात आवश्यक आहे. महिलांच्या सन्मानाला शक्तिशाली अहंकारी वासनांध पुरुषाने एकट्याने किंवा सामूहिकरीत्या कुस्करून टाकावे यासारखे भयानक कृत्य आणि गुन्हा दुसरा कुठलाही नाही. जसजसा शोध आणि विज्ञानाच्या वाटेवर माणूस अधिकाधिक अत्याधुनिक होत चालला आहे तसतसे लोकांतील संस्कार आणि संस्कृती लोप पावत चालली आहे काय यावर गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. ■

बांगलादेशात मोहम्मद युनुस यांचे काळजीवाहू सरकार स्थापन होऊनही तेथील हिंसाचार थांबलेला नाहीये. यामध्ये तेथील हिंदूंच्या घरांना, व्यवसायांना आणि मंदिरांना लक्ष्य केले जात आहे. भारताने याबाबत तातडीने पावले उचलायला हवीत. या देशाला मदत करताना सावध राहून अल्पसंख्याक हिंदूंचे संरक्षण होतेय का, हे पाहायला हवे. बांगलादेशात हिंदूंचा छळ झाला तर त्याचे परिणाम भारतासोबतच्या संबंधांवर होतील व ते परराष्ट्र धोरणाच्या दृष्टीने नुकसानकारक आहे, याची जाणीव बांगलादेशला करून द्यायला हवी. तेथील हिंदूंच्या संरक्षणासाठी भारताने आंतरराष्ट्रीय पातळीवरून दबाव आणला पाहिजे.

# प्रश्न बांगला देशातील हिंदूंच्या संरक्षणाचा

भारताचा शेजारी देश असणाऱ्या बांगला देशामध्ये निर्माण झालेले अराजक शेख हसीना यांनी राजीनामा देऊन देश सोडण्याचा निर्णय घेतल्यानंतरही आणि नवे काळजीवाहू सरकार स्थापन होऊनही थांबलेला दिसत नाहीये. यामधील एक चिंतेची बाब म्हणजे, तेथे होणारे हिंदू अल्पसंख्यांकांवरील हल्ले. अर्थात हे हल्ले आजच होत नाहीयेत हेही लक्षात घ्यायला हवे; पण बांगलादेशातील हिंदूंची घरे जाळून आक्रमणकर्ते भारताला निश्चितपणे चिथावणी देत आहेत. १९४७ मध्ये बांगलादेशात २४ टक्के हिंदू होते. सध्या त्यांची संख्या कमी होऊन आता ती केवळ ८ टक्के राहिली आहे. त्यामुळे अन्य १६ टक्के हिंदूंचे धर्मांतर करण्यात आले, काहींना मारण्यात आले आणि काही पलायन करून भारतात आश्रयाला आले आहेत. आता शिल्लक राहिलेल्या दीड कोटी हिंदूंच्या विरोधातही तीच कारवाई केली जात आहे. त्यामुळे भारतासाठी ही निश्चितच चिथावणी आहे, असे म्हटले पाहिजे. भारत बांगलादेशात जाऊन हिंदूंचे रक्षण करू शकतो का ?, तर त्याचे उत्तर 'नाही', असे आहे. भारत बांगलादेशातील सैन्यावर केवळ दबाव टाकू शकतो; पण जे सैन्य त्यांचे पंतप्रधान आणि अवामी लीगचे नेते यांना वाचवू शकले नाही, ते हिंदूंना कसे वाचवतील?, हा एक मोठा प्रश्न आहे. त्यामुळे भारताने हिंदूंच्या रक्षणासाठी आंतरराष्ट्रीय दबाव निर्माण केला पाहिजे. यासमवेतच जे हिंदू भारतात येण्याचा प्रयत्न करत आहेत, त्यांना आश्रय दिला पाहिजे. अन्यथा ते सर्व मारले जातील आणि त्यांच्या महिलांवर अत्याचार होतील, तसेच त्यांच्या भूमीही कह्यात घेण्यात येतील.

भारतात स्थलांतरित झालेल्यांची संपत्ती बांगलादेश सरकारने ताब्यात घेतली. पाकिस्तानने १९६५ च्या युद्धादरम्यान भारतीयांना शत्रू घोषित करून 'शत्रु संपत्ती निर्बंध १९६५' लागू करून भारतीयांची (मुख्यत्वेकरून हिंदू व बौद्धांची) पूर्व व पश्चिम पाकिस्तानात असलेली संपती ताब्यात घेतली होती. बांगलादेशाने स्वातंत्र्यानंतर व्हेस्टिंग ऑफ प्रॉपर्टी अँड ॲसेट ऑर्डर १९७२ लागू करून कुठल्याही निर्बंधांखालील पाकिस्तान सरकारच्या किंवा मंडळाच्या व भूतपूर्व पाकिस्तानच्या ताब्यातील व अधिपत्याखालील सर्व संपती- मालमत्ता बांगलादेश सरकारकडे हस्तांतरित केली. पश्चिम पाकिस्तानातील लोकांच्या ज्या संपती पूर्व पाकिस्तानात होत्या त्या या नियमान्वये बांगलादेशने ताब्यात घेतल्या. पण पूर्व व पश्चिम पाकिस्तानन 'शत्रू संपत्ती निर्णय १९६५' अनुसार भारतीयांची किंवा भारतात स्थलांतरित झालेल्यांची जी संपती ताब्यात घेतली होती तीसुद्धा बांगला देश सरकारच्या ताब्यात गेली. बांगला देशच्या घटनेनुसार भारत शत्रुराष्ट्र नाहीये. तरीही भारतीयांची किंवा भारतात स्थलांतरीत झालेल्यांची संपत्ती बांगला देश सरकारने ताब्यात घेतली. पाकिस्तान सरकारने ताब्यात घेतलेली संपत्ती बांगलादेशने त्यांच्या मूळ मालकाला परत केली नाहीच, उलट दिवसेंदिवस त्या संपत्तीच्या यादीमध्ये वाढ करत राहिले. तसेच राज्य अधिग्रहण कार्यालयातील तहसीलदार व इतर कर्मचाऱ्यांना त्यांच्या संबंधित अधिकारक्षेत्रामध्ये कोणतीही लपवलेली निहित संपत्ती शोधून काढली किंवा सादर केली तर त्यास योग्य ते पारितोषिक दिले जाईल, असे घोषित करून एक प्रकारे व्हेस्टेड संप्रती यादीत नवीन भर घालण्यासाठी प्रोत्साहित करत राहिले.

ढाका विद्यापीठाचे प्रा. अबुल बरकत यांनी 'ॲन इनक्वायरी इनटू कॉजेस अँड कॉनसिक्वेन्सेस ऑफ डिप्रिव्हिएशन ऑफ हिंदू मायनॉरिटीज इन बांगला देश थ्रू द व्हेस्टेड ॲक्ट' या पुस्तकातून या कायद्याद्वारे हिंदूंच्या जमीनचोरीचे व अन्यायाचे पुराव्यासकट अभ्यासपूर्ण विवेचन केले आहे. या निर्बंधामुळे बांगलादेशातील ४० टक्के हिंदू कुटुंबे बाधित झाली आहेत. त्यात जवळपास ७.५ लक्ष शेतीवंचित कुटुंबे समाविष्ट होती. परिणामी हिंदू कुटुंबांनी गमावलेल्या एकूण जमिनीचे क्षेत्रफळ अंदाजे १६.४ लक्ष एकर इतके आहे. हिंदू समाजाच्या

**ब्रिगेडियर हेमंत महाजन, (निवृत्त)**

मालकीतील एकूण जमिनीचा विचार करता ही जमीन ५३ टक्के आहे व बांगलादेशच्या एकूण भूमीच्या ५.३ टक्के आहे. प्रा. बरकत यांच्या सर्वेक्षणानुसार, हिंदूंच्या जमिनीची सर्वच प्रमुख राजकीय पक्षानी सामुदायिक चोरी केली आहे. यामध्ये अवामी लीगचाही समावेश असून त्यांनी ४४.२ टक्के जमीन चोरली आहे. त्याखालोखाल बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी ३१.७ टक्के, जातीय पार्टी ५.८ टक्के, जमाते-ए-इस्लामी ४.८ टक्क आणि इतर १३.५ टक्के असे प्रमाण आहे. बांगलादेशातील हिंदूंनी या निर्बंधान्वये २००१-२००६ या ६ वर्षांतच अंदाजे २२ लाख एकर स्थावर व जंगम मालमत्ता गमावली आहे.एकीकडे ही जमीन गमावलेली असताना आता नव्या आंदोलनादरम्यान त्यांना लक्ष्य केले जात आहे. मोहम्मद युनूस हे बांगलादेशात स्थापन झालेल्या काळजीवाहू सरकारचे प्रमुख आहेत. तेथील ५२ जिल्ह्यात हिंदूंवर २०० हून अधिक हल्ले झाले आहेत, याबाबत युनूस सरकारन चिंता व्यक्त केली आहे. पण बांगलादेशातील हिंदू आपल्या सुरक्षेविषयी अत्यंत घाबरले आहेत. याचबरोबर काहींनी भारतीय सीमेवर पलायन केले आहे.

आज दीड ते दोन कोटी हिंदू बांग्लादेशात आहेत. पाकिस्तानातील हिंदूंची संख्या १९५० मध्ये ८ ते ९ टक्के होती, ती आज पाच लाखांवर म्हणजे एक टक्क्याहून कमी झालेली आहे. पूर्व पाकिस्तानात (आताच्या बांगलादेशात) फाळणीनंतर १९५० मध्ये २४ ते २५ टक्के हिंदू होते. बांगलादेशात आज केवळ ८.६ टक्के हिंदूच शिल्लक उरले आहेत. मग बाकी १६ टक्के हिंदू गेले कुठे? ते मारले गेले किंवा त्यांनी धर्म परिवर्तन केले किंवा काही भारतामध्ये पळून आले. येणाऱ्या काळातही अशीच स्थिती ओढावण्याच्या शक्यता निर्माण झाल्या आहेत.

मुळात एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, शेख हसीना बांगला देशात प्रदीर्घ काळ सत्तेत असतानाही त्यांच्या सरकारपुढे इस्लामी मूलतत्त्ववादाचे आव्हान अत्यंत बिकट होते. अवघ्या पाच दशकांपूर्वी एक धर्म एक राष्ट्र अशा वैचारिक मांडणीस पूर्णपणे नाकारून बंगाली अस्मितेवर आधारलेल्या राष्ट्रवादाचा पुरस्कार केलेल्या बांगलादेशमध्ये इस्लामी मूलतत्त्ववादाच्या प्रभावामुळे 'आमार शोनार बांगला'ची वाटचाल आता वहाबी मूलतत्ववाकडे सुरू आहे. हिंदूंसह ख्रिश्चन, बौद्ध यांच्यासारखे अल्पसंख्याक जीव मुठीत घेऊनच राहत आहेत. लोकांना येथील कडव्या मूलतत्त्ववाद्यांच्या अत्याचारांचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे अल्पसंख्याक बांगलादेशींचे भारतात पळून येण्याचे प्रमाण येत्या काळात लक्षणीय प्रमाणात वाढू शकते. १९७१ च्या युद्धात झालेला ३५-४० लाख हिंदूंचा वंशविच्छेद अमेरिकन पत्रकार गेरी बास याला जगासमोर आणावा लागला होता. अमेरिकन ज्यू व मानवतावादी कार्यकर्ता डॉ. रिचर्ड बेन्किन बांगलादेशातील अल्पसंख्याकांसाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर वैचारिक व कायदेशीर मार्गाने लढतोय. असे असताना भारतातील काही तथाकथित पुरोगामी, सेक्युलर्स, मानवतावादी, बुद्धीवादी विचारवंत बांगलादेशात होणाऱ्या हिंदूंच्या, बौद्धांच्या नृशंस हत्याकांडाविषयी गप्प का बसतात?

बांगलादेशातील बदललेल्या परिस्थितीत भारताने तेथील सत्ताधारी पक्ष व विरोधी पक्षांशी चांगले संबंध प्रस्थापित करणे आवश्यक आहे. भारताने त्या देशाला मदत करताना सावध राहून अल्पसंख्याक हिंदूंचे संरक्षण होतेय का, हे पाहायला हवे. बांगलादेशात हिंदूंचा छळ झाला तर त्याचे परिणाम भारतासोबतच्या संबंधांवर होतील व ते परराष्ट्र धोरणाच्या दृष्टीने नुकसानकारक आहे, याची जाणीव बांगलादेसला करून द्यायला हवी. तेथील हिंदूंच्या संरक्षणासाठी भारताने आंतरराष्ट्रीय पातळीवरून आणले पाहिजे. संयुक्त राष्ट्रसंघाचे अधिवेशन पुढील महिन्यात भरणार आहे. न्यूयॉर्कमधील या अधिवेशनामध्ये भारताने बांगला देशातील हिंदू अल्पसंख्यांकांचा मुद्दा प्रकर्षाने मांडला पाहिजे. संयुक्त राष्ट्रसंघ, अमेरिका, प्रगत युरोपीयन देश हे नेहमीच भारताला अल्पसंख्यांकांच्या प्रश्नांबाबत, हक्कांबाबत शहाजोगपणाचे सल्ले देत असतात, टीका करत असतात. मग आता बांगला देशातील हिंदूंवरील हल्ल्याबाबत त्यांची भूमिका पुढे का येत नाहीये? ■

# गुड'मॉर्निंग'

दिवसाची अर्थपूर्ण सुरुवात

## पंचांग

बुधवार, दिनांक २८ ऑगस्ट २०२४ श्रावण कृ १०, श्री शके १९४६, विक्रम शोभन २०७९, क्रोधीनाम संवत्सर, दक्षिणायन, सौर शरद ऋतू. शुभ दिवस दुपारी १.२२ पर्यंत, बुधपूजन, मंगलनाथ महाराज जन्मोत्सव, इंदौर. नक्षत्र : मृगशीर्ष, योग : वर्ज, करण : वणिज. सूर्योदय : स.०६.२५ सूर्यास्त : सायं.०६.५४ वा. राहू काळ : दुपारी : १२:०० ते १:३०

## दिनविशेष

*१७३३ : मराठी आरमारातील पराक्रमी अधिकारी सखोजी ऊर्फ जयसिंगराव आंग्रे यांचे निधन. *१८२८ : लिओ टॉलस्टॉय यांचा जन्मदिन. *१८३३ : ब्रिटिश साम्राज्यातून गुलामगिरी नष्ट करणारा कायदा संमत. *१८९५ : लुई पाश्चरचे निधन. *१९०४ : भारतातील मोटारगाडी कोलकाता ते बरेकपूर दरम्यान धावली. *१९९० : इराकने कुवेत हा आपला १९ वा प्रांत असल्याचे जाहीर केले. त्यातूनच आखाती युद्ध पेटले. नंतर इराकला माघार घ्यावी लागली. *१९९६ : सामाजिक कार्यकर्त्या आणि महिला सेवाग्रामचे २७ वर्षे काम करणाऱ्या लेखिका सुमती संत यांचे निधन. *२००१ : ग्रामीण भाग, निसर्गाचे वर्णन चित्रवती शैलीत करणारे लेखक, निसर्गप्रेमी, चित्रकार, शिकारी, पटकथाकार असे असाधारण प्रतिभाशाली कलावंत व्यंकटेश माडगूळकर यांचे निधन. *२००२ : केंद्र सरकारने २००० साली दिलेले पेट्रोल पंपांचे आणि केरोसीनचे परवाने रद्द केले.

## राशीभविष्य

* **मेष** : दूरचे प्रवास संभवतात. * **वृषभ** : इच्छा पूर्ण होतील. * **मिथुन** : कर्तव्याला चुकू नका. * **कर्क** : परदेशप्रवासाचे बेत आखाल. * **सिंह** : विरोधकांचा त्रास जाणवेल. * **कन्या** : वैवाहिक सौख्य लाभेल. * **तुळ** : वरिष्ठांशी मतभेद संभवतात. * **वृश्चिक** : संततीबद्दलची सुवार्ता समजेल. * **धनु** : इलेक्ट्रॉनिक वस्तूंची खरेदी कराल. * **मकर** : प्रियजनांच्या भेटी होतील. * **कुंभ** : वाहने जपून चालवा. * **मीन** : स्थावर मालमत्तेचे प्रश्न सुटतील.

## मेसेज आया

मैत्री आपली मनात जपलीस
कधी सावलीत कधी उन्हात
तापली कधी फुलात कधी काट्यात
रुतली तरीही तू ती मनात जपलीस....



## व्यक्तीविशेष

**रुदरफोर्ड अर्नेस्ट**

सर आयझॅक न्यूटन व मायकेल फॅरेडे यांच्याइतकेच प्रसिद्ध असणाऱ्या रुदरफोर्ड अर्नेस्ट या ब्रिटिश भौतिकशास्त्रज्ञाचा जन्म २८ ऑगस्ट १८७३ रोजी झाला. किरणोत्सर्ग व आण्विक संरचनेच्या अणुकेंद्रीय सिद्धांतामुळे प्रसिद्धीस आलेल्या या शास्त्रज्ञाला १९०८ चे नोबेल पारितोषिक मिळाले. चुंबकीय क्षेत्र व क्ष किरणासंबंधी संशोधन करणाऱ्या या शास्त्रज्ञाने धन व ऋण आयनांच्या संयोजनाचा वेग व त्वरा मोजण्याचे यंत्र शोधून काढले. अल्फा, बीटा व गॅमा या किरणांचा शोध लावला. रेडियम, थोरियम व ॲक्टिनियम या किरणोत्सर्गी मूलद्रव्यांचे अणु किरणोत्सर्ग प्रक्रियेत स्वयंस्फूर्तपणे विघटन पावून अगदी भिन्न मूलद्रव्यांचे अणु तयार होतात व हे अणुही किरणोत्सर्गी असतात, हे त्यांनी दाखवून दिले. आण्विक संरचनेसंबंधीचा अणुकेंद्रीय सिद्धांत १९११ मध्ये मांडणाऱ्या या शास्त्रज्ञाने १९१९ मध्ये अणुकेंद्राचे कृत्रिम विघटन, हा महत्त्वपूर्ण शोध लावला. त्यांच्या या शोधामुळेच अणुऊर्जा युगाचा उदय झाला. न्यूझीलंडमधील नेल्सनजवळील स्प्रिंग ग्रोव्ह येथे जन्मलेला हा अणुकेंद्रीय भौतिकीचा जनक दि. १९ ऑक्टोबर १९३७ रोजी निधन पावला.

## बोधकथा

**कृतज्ञता**

फार फार वर्षांपूर्वी आकाश आणि पृथ्वी यांनी स्वतःला प्रेमानं बांधून ठेवलं होतं. काही दिवसांनी त्यांना बाळ झालं, ते जग (विश्व) या नावानं ओळखलं जाऊ लागलं. कालांतरानं या जगाच्या निर्मितीतून जन्माला आलेलं बाळ म्हणजे सृष्टी या बाळांसाठी पृथ्वीनं हिरव्या वनांच्या कुंच्या शिवून पानाफुलांच्या वेलबुट्टीनं त्या रंगवल्या. त्यांच्यासाठी नद्या-नाल्यांचं अमृत, धान्य कोठार तयार केली. जगाचे हे बाळ हळूहळू सुदृढ झालं. अवाढव्य वाढू लागलं. त्याला पृथ्वीची कुस पुरेनाशी झाली. आकाश पृथ्वी तर जवळजवळ चिकटलेले होते. खेळायला, बागडायला अवकाशच नव्हता. मग पृथ्वीची ही उसळत्या उत्साहाची, स्वार्थी उड्या मारणारी बाळं विचारात पडली. त्यांनी ठरवलं, आपल्यातल्या छोट्यांनी आईला (पृथ्वीला) पायांनी हळूहळू ढकलू. तोठ्यांनी हाताच्या रेट्यानं बाबांना (आकाशाला) वर ढकलू. मग ते दोघं लांब जातील. मग मधल्या भागात आपणाला पुरेशी जागा मिळेल. हे करण्यात त्यांना यश आलं आणि पृथ्वी व आकाश एकमेकांपासून कायमचे दूर गेले. फक्त क्षितीजावर ते पूर्वीसारखे एकत्र असल्याची खूण उरली. पुन्हा कधी त्यांची भेट झालीच नाही. आता वर्षातून एकदा पृथ्वी आपल्या पतीसाठी बाष्पाचे दूत वर पाठवते आणि त्यात सृजनाचे तेज मिसळून आकाश पृथ्वीवर बरसते. या मिलनावेळी पृथ्वी मोहरते. हिरवा शालू नेसून सजते, अशी ही मालवण प्रांतातली लोककथा.

तात्पर्यः- आकाश हे शक्तीचं प्रतीक, तर पृथ्वी ही निर्मितीचं मायेचं, प्रतीक. शक्ती आणि माया दूर गेली, तर समजात कृतज्ञतस कुठून येणार?

## भूगोल

**क्युबा**

कॅरेबियन समुद्रातील ग्रेटर ॲंटिलीस किंवा वेस्ट इंडिज या द्वीपसमूहांपैकी सर्वात मोठे बेट म्हणजे क्यूबा. क्यूबा हा साम्यवादी देश आहे. शेजारच्या लहानमोठ्या बेटांसह याचे क्षेत्रफळ १ लाख १० हजार ९२२ चौरस किलोमीटर आहे. याची पूर्वपश्चिम लांबी सुमारे १२०० किलोमीटर इतकी आहे. याच्या उत्तरेस अटलांटिक महासागर व त्यातील फ्लोरिडाचे द्वीपकल्प आणि बहामा बेटे आहेत; तर पूर्वेस विंडवर्ड पॅसेज आहे. मेक्सिको आणि पनामा यांच्या मार्गावरील मोक्याच्या ठिकाणी असल्यामुळे क्यूबाचे भौगोलिक स्थान महत्त्वाचे आहे. त्यामुळेच आंतरराष्ट्रीय राजकारण, अर्थकारण यांमध्येही क्यूबातील घडामोडींना वेगळे महत्त्व आहे. याची राजधानी हॉवाना आहे.

## नवं संशोधन

**आनुवांशिक कॉलेस्ट्रॉलला जबाबदार जनुकाचा शोध**

संशोधकांनी आता एका अशा जनुकाचा शोध लावला आहे जो एकाच कुटुंबातील पिढ्यांमधील उच्च कॉलेस्ट्रॉलशी निगडित आहे. यामुळे हृदयविकाराचा झटका, स्ट्रोक, हृदयाच्या झडपांची समस्या निर्माण होतात. फॅमिलियल हायपरकॉलेस्ट्रॉलस्टीरोलेमिया ही एक आनुवांशिक स्थिती आहे. जी कमी घनत्वाच्या लीपोप्रोटीन कॉलेस्ट्रॉल (एलडीएल-सी) किंवा बॅड कॉलेस्ट्रॉलशी निगडित असते. कॉलेस्ट्रॉलमधील लीपोप्रोटीन फॅमिलियल हायपरकॉलेस्ट्रॉलस्टीरोलेमियाच्या एक चतुर्थांश प्रकरणांना कारणीभूत असते. डेन्मार्कमधील कोपेनहेगन युनिव्हर्सिटीतील हेरलेव्ह हॉस्पिटलच्या ॲनी लॅंस्टेड यांनी याबाबतची माहिती दिली. आनुवंशिक समस्येने ग्रस्त लोकांच्या रक्तात लीपोप्रोटीन (ए) चे प्रमाण अधिक असल्याचे दिसून आले आहे. अशा लोकांना हृदयविकाराचा झटका येण्याचा धोका पाच पटीने अधिक असतो.

## सोडवा सुडोकू

सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटीमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.

क्रमांक २०७

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | 4 | | |
| | | 3 | 4 |
| 4 | 3 | 2 | |
| 1 | | | |

क्रमांक २०६ चे उत्तर

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | 3 | 1 | 4 |
| 4 | 1 | 2 | 3 |
| 3 | 2 | 4 | 1 |
| 1 | 4 | 3 | 2 |

## हास्यविनोद

**भीमाकाकू** : अहो, ऐकलंत का? तुमचा तो मित्र ज्या मुलीशी लग्न करतोय ती अत्यंत हेकेखोर आणि कटकटी आहे.

**श्यामराव** : मग मी काय करु?

**भीमाकाकू** : तुम्ही जरा समजावा ना तुमच्या मित्राला.

**श्यामराव** : मी कशाला जाऊ समजावून सांगायला? माझ्या लग्नाच्या वेळी मला समजावून सांगायला कुणी आलं होतं का?



# वकिलीचे अंतरंग उलगडणारा ग्रंथ

ॲड. मिलिंद चिंधडे यांनी लिहिलेला 'वकिलीच्या अंतरंगात' हा ग्रंथ डिंपल पब्लिकेशनने नुकताच प्रसिद्ध केला आहे. त्याचे दिमाखात नाशिकला प्रकाशन झाले आहे. पुस्तक हाती घेतल्यावर नाशिकचा सुवास दरवळतो. पहिल्या पावसात मातीतून मृद्गंध दरवळतो, तसा कोऱ्या पुस्तकाचा गंध हा काही औरच असतो. तसं हे पुस्तक आतबाहेर जाणवले.

या पुस्तकात ६१ वकिलांचे व न्यायाधीशांचे अंतरंग उलगडून परिचय व परीक्षण करून दिला आहे. मुखपृष्ठावरील वकिलाचे चित्र आकर्षक आहे. मलपृष्ठावर न्या. नरेंद्र चपळगावकर यांनी आशयगर्भ अभिप्राय मांडला आहे. ६१ वकील व न्यायाधीश यांनी स्वतः लिहिलेली पुस्तके मिळवताना लेखकाने अपार कष्ट सोसले आहेत. म्हणून या लेखनाला प्रमाण प्राप्त झाले आहे.




हे वकील व न्यायाधीश आपल्या क्षेत्रातील नामांकित तर आहेतच त्यांच्या अनेक पुस्तकांना साहित्याचा विशिष्ट दर्जा प्राप्त झाला आहे. म्हणून ही निवड सार्थ वाटते. होतकरू वकील व वाचकांना न्यायक्षेत्रातील बरीचशी माहिती प्राप्त होते. त्यामुळे पुस्तक कंटाळवाणे वाटत नाही. या व्यवसायातील एथिक्स काय आहेत व भानगडी कशा असतात याची जाण आल्यावाचून राहत नाही. या कायदेतज्ज्ञांची पुस्तके वाचण्यासाठी लेखकाने जागोजागी शिफारस केली आहे. प्रत्येक पुस्तकाचा परिचय करून देत असताना आकर्षक शीर्षके दिलेली आहेत. ग्रंथाची भाषा सोपी व प्रासादिक आणि सर्वसामान्य वाचकाला समजेल अशीच आहे. पुस्तकांच्या जगात हा ग्रंथ कायमस्वरूपी टिकणारा असाच आहे. तो एक संशोधनात्मक प्रबंध आहे असे काही जाणकारांनी म्हटले आहे. देशभरातील न्यायाधीशांच्या आत्मचरित्रांचे वेचक परीक्षण या पुस्तकामध्ये आलेले आहे. न्यायक्षेत्रात हा एक संदर्भ ग्रंथ होऊ शकेल. वकिली व्यवसायातील विविध पैलू या ग्रंथात बघावयास मिळतात. या ग्रंथाला वाङ्मयीन मूल्याबरोबर वाचकमूल्यही प्राप्त झाले आहे. विशेष म्हणजे त्यांनी संकलित केलेल्या, पुस्तकांचे लघु छायांकित मुखपृष्ठांचे चित्र प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी टाकले आहेत.

**पुस्तक परिचय :** अशोक पाटील
**लेखक:** ॲड. मिलिंद चिंधडे
**डिंपल पब्लिकेशन**
किंमत: रुपये तीनशे

'राष्ट्र संचार' हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave

Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

### पोलीस प्रशासन, विविध सामाजिक संस्थांचाही सहभाग

# महापालिका शाळांमध्ये सुरक्षा उपायांबाबत विविध उपक्रम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** महापालिका शाळांमधील विद्यार्थ्यांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी महापालिकेच्या सर्व प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमध्ये सर्वसमावेशक सुरक्षा उपायांबाबत विविध उपक्रम राबविले जात आहेत. याअंतर्गत विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित करून विविध उपाययोजना केल्या जात असून यामध्ये पालक, पोलीस प्रशासन तसेच विविध सामाजिक संस्थांचाही सहभाग वाढविण्यावर भर दिला जात आहे.

'पोलीस काका' उपक्रम आणि 'दामिनी' पथकासह स्थानिक पोलीस दलांच्या सहकार्याने महापालिकेच्या वतीने विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांसाठी सुरक्षा जागरूकता सत्रांचे आयोजन केले जात आहे. या सत्रांद्वारे रस्ते किंवा इतर अपघातांपासून आणि शाळा तसेच आजूबाजूच्या इतर परिसरातील सुरक्षा उपायांवर मार्गदर्शन केले जात आहे.

बाल लैंगिक शोषण, गुड टच आणि बॅड टच, पालकांची भूमिका आणि मुलांचे हक्क याबद्दल जागरूकता सत्र आयोजित करण्यासाठी मुस्कान फाउंडेशन तसेच महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेसोबत काम करणाऱ्या अर्पण संस्थेसारख्या संस्थांसोबत महापालिकेने भागीदारी केली आहे. मुलांचे अत्याचारापासून संरक्षण कसे करावे आणि त्यांची सुरक्षितता कशी सुनिश्चित करावी याबद्दल शाळांमध्ये या संस्थांमार्फत शिबीरांचे आयोजन केले जात आहे.

याव्यतिरिक्त, विद्यार्थ्यांच्या भावनिक, मानसिक, सामाजिक आणि शैक्षणिक विकासाला चालना देण्यासाठी तसेच मार्गदर्शन करण्यासाठी २३ समुपदेशकांची नेमणूक करण्यात आली आहे. हे समुपदेशक शैक्षणिक ताणतणाव ते वैयक्तिक सुरक्षितता अशा सर्व गोष्टींबाबत मुलांचे मार्गदर्शन करण्यासाठी कायम उपलब्ध असणार आहेत. तसेच प्रत्येक शाळेत शाळा व्यवस्थापन समितीची स्थापना करणे बंधनकारक आहे, जेणेकरून सुरक्षा उपायांची अंमलबजावणी आणि देखरेख करण्याच्या महत्त्वपूर्ण भूमिकेवरही लक्ष केंद्रित केले जात आहे. तसेच या समित्यांद्वारे सुरक्षा लेखापरिक्षण केले जात असून या लेखापरिक्षणाचे विश्लेषण करून कृती आराखडा तयार करून योग्य उपाययोजना करण्यावर भर दिला जात आहे.

> "महापालिका शाळांमधील विद्यार्थ्यांची सुरक्षा ही सर्वोच्च प्राथमिकता असून सर्व शाळांमध्ये सुरक्षित आणि पोषक वातावरण निर्माण करण्यावर महापालिकेने नेहमी भर दिला आहे. यासाठी समुपदेशकांची नियुक्ती आणि शाळेच्या सर्वांगीण सुरक्षिततेबाबत विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत. प्रत्येक विद्यार्थ्याला वर्षभर सुरक्षित वातावरणात शिक्षण घेता यावे, त्याच्या कलागुणांना वाव मिळावा आणि शिक्षणातील गोडी वाढावी यासाठी महापालिका कटिबद्ध आहे."
> — **शेखर सिंह** आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी-चिंचवड महापालिका



दरवर्षी भारत सरकारच्या वतीने राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह आयोजित करण्यात येतो. याअंतर्गत करण्यात आलेल्या महापालिका शाळांच्या सुरक्षा लेखापरिक्षणात भौतिक सुरक्षा, अग्नि सुरक्षा, भूकंप आणि आपत्ति व्यवस्थापन सुरक्षा, विद्युत सुरक्षा, बांधकामांच्या धोक्यापासून सुरक्षा, क्रीडांगण आणि क्रीडाविषयक सुरक्षा, प्रयोगशाळा आणि त्यातील अपघात सुरक्षा, परिवहन व्यवस्थापन, सामाजिक, भावनिक आणि वैयक्तिक सुरक्षा, आघात व्यवस्थापन, दिव्यांग विद्यार्थी सुरक्षा, आरोग्य विषयक सुरक्षा, मध्यान्ह भोजन, स्वच्छता, बाल लैंगिक अत्याचाराविरुद्ध सुरक्षा, सायबर सुरक्षा अशा विविध विषयांचे लेखापरिक्षण करण्यात आले आहे. या सर्व विषयांना अनुसरून शाळा मुख्याध्यापकांना प्रश्नावली देण्यात आली होती. या प्रश्नावलीच्या उत्तरांच्या आधारे कृती आराखडा तयार करून योग्य उपाययोजना करण्यावर भर दिला जात आहे.




## » Selected



### संत ज्ञानेश्वर महाराजांची जयंती उत्साहात साजरी

**पिंपळे सौदागर :** कधी ऊन तर कधी सावली, सोबत रिमझिम पाऊसधारा निसर्गातील या आल्हाददायक वातावरणाशी साधर्म्य साधत भाव भक्तिपर गीतांच्या स्वरधारांची अनोखी अनुभूती उपस्थितांना मिळाली. निमित्त होते संत ज्ञानेश्वर महाराज जयंतीचे. पिंपळे सौदागर परिसरातील श्री संत ज्ञानेश्वर ब्राह्मण सभेच्या वतीने सोमवार दि. २६ रोजी सायंकाळी मोठ्या उत्साहात ज्ञानोबा माऊलींची जयंती साजरी करण्यात आली. कुणाल आयकॉन रोडवरील बाळासाहेब कुंजीर क्रिडांगणावर विलास जोशी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाचा प्रारंभ हेमलता गोडबोले, निलिमा कुलकर्णी, अलका मुळे, सुजाता अपराजित यांनी सादर केलेल्या हरिपाठाने करण्यात आला. त्यानंतर ज्येष्ठ नागरिक चारुहास शुक्ल यांच्या हस्ते ज्ञानेश्वर माऊलींच्या मुर्तीचे पूजन करण्यात आले.

शशिकांत कुलकर्णी, प्रकाश मोदी, स्नेहा चिंचवडकर , वासंती जोशी, वृषाली चांदोरकर , संध्या माशाळकर आदिंनी भक्तीगीते सादर करुन उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन रमेश भट यांनी केले. पसायदान आणि राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्रीनाथ जोशी, राजेंद्र तिखे -कुलकर्णी, दिनेश कुलकर्णी यांनी परिश्रम घेतले.



### पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करा, महापालिकेचे आवाहन

**पिंपरी :** महापालिकेच्या उपक्रमात शहरातील नागरिकांचा महत्वपूर्ण सहभाग असतो. त्यामुळे दरवर्षी प्रमाणे यंदाही पर्यावरणपूरक, नैसर्गिक रंग वापरून, पाण्यात सहज विरघळणाऱ्या शाडू मातीच्या मुर्तींची निर्मिती करावी. तसेच सर्व नागरिकांनी पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करावा. असे आवाहन महापालिकेच्या जनसंवाद सभेच्या माध्यमातून करण्यात आले.

नागरिक आणि प्रशासन यांच्यामध्ये सुसंवाद राखण्यासाठी तसेच तक्रारींचे निवारण जलदगतीने व्हावे यासाठी महिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या सोमवारी जनसंवाद सभेचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार महापालिकेच्या आठही क्षेत्रीय कार्यालयांमध्ये आज जनसंवाद सभा पार पडली. या जनसंवाद सभेत ८० नागरिकांनी सहभाग घेऊन तक्रारवजा सूचना मांडल्या.

### ज्ञानज्योती विद्यालयाची विज्ञान केंद्राला भेट

**पिंपरी:** ज्ञानाई शिक्षण संस्थेचे कै. जगन्नाथ तुकाराम राऊत प्राथमिक विद्यालय व ज्ञानज्योती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांची विज्ञान केंद्राला भेट दिली.

शालेय जीवनात प्रत्येक जण पुस्तकांमधून विज्ञानाची ओळख करून घेत असतात. परंतु प्रत्यक्ष वैज्ञानिक प्रयोग कसे असतात त्या मागील विज्ञान काय आहे हे पिंपरी चिंचवड सायन्स पार्क मार्फत विद्यार्थ्यांना दाखविण्याचा प्रयत्न करण्यात आला. मुलांना विज्ञानाची गोडी लागावी शहर आणि परिसरात ऑटोमोबाइल कंपन्यामुळे पिंपरी चिंचवड हे ऑटोमोबाइल हब म्हणूनही ओळखले जाते. त्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना वाहनांनी माहिती देण्यात आली.

सौरमंडळाविषयी थ्रीडी शो तारामंडळ शो आणि थेट प्रात्यक्षिके यासारखे अनेक विज्ञान शो या केंद्रामध्ये विद्यार्थ्यांसाठी व शिक्षकांसाठी क्रियाकलाप आधारित कार्यक्रम आणि कार्यशाळा आयोजन करण्यात येतात. यामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात तर भर पडलीच परंतु शिक्षकांनीही नव्या युगातील वैज्ञानिक बाबींची उजळणी झाली.

### युट्यूबवर वाहन चोरी व्हिडीओ बघत चोरल्या १८ दुचाकी

**पिंपरी :** एक तरुण मागील काही महिन्यांपूर्वी घरच्यांसोबत भांडण झाले म्हणून रागाने सातारा येथून पुणे शहरात आला आणि मोठा उपद्व्याप केला. युट्युबवर त्याने वाहन चोरी कशी करायची, याचे व्हिडीओ पाहिले. त्यातून मिळालेल्या ज्ञानाच्या आधारे त्याने एक ना दोन तब्बल १८ दुचाकी चोरल्या. अखेर पिंपरी-चिंचवड गुन्हे शाखा युनिट चारने त्याला बेड्या ठोकल्या. अभिषेक मल्लाप्पा हावळेकर (वय २१, रा. आंबेठाण, चाकण. ता. खेड. पुणे. मूळ रा. साई दर्शन कॉलनी, शाहूपुरी, सातारा) असे अटक केलेल्या तरुणाचे नाव आहे. त्याच्या अल्पवयीन साथीदाराला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

**राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा**

## देहूतील विकासकामांसाठी १५ कोटी निधी देणार

**देहूगाव :** नगरपंचायत हद्दीतील नागरिकांना पाण्याची टंचाई भासू नये याकरिता नवीन पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव मंजुरीच्या अंतिम टप्प्यात असून लवकरच हा प्रश्न मार्गी लागेल, असे आमदार सुनिल शेळके यांनी सांगितले. देहू नगरपंचायत कार्यालयात रविवारी मुख्याधिकारी, सर्व अधिकारी आणि ठेकेदार यांच्या विविध कामांच्या आढावा बैठकीत आमदार सुनील शेळके बोलत होते.

यावेळी देहू नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी निवेदिता घार्गे, नगराध्यक्षा पूजा दिवटे, उपनगराध्यक्ष मयूर शिवशरण, विविध समित्यांचे सभापती, नगरसेवक, नगरसेविका, ठेकेदार, नगरपंचायतीचे अधिकारी, ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी देहूतील विविध विकास कामांसाठी १५ कोटी रुपयांचा निधी लवकरच उपलब्ध करून देऊ, असे आश्वासन आमदार शेळके यांनी दिले.

नागरिकांच्या अडचणीचा विचार करता गणेशोत्सवापूर्वीच सुरू असलेल्या सर्व रस्त्यांची कामे पूर्ण करण्यात यावीत. पदपथावर बसणाऱ्या भाजी विक्रेत्यांकडून बाजार कर वसूल करू नये. कोणत्याही बांधकाम व्यावसायिकाला त्याच्या मंजूर आराखड्यानुसार काम केले असेल तरच भोगवटा प्रमाणपत्र (पुर्णत्वाचा दाखला) द्यावे. अन्यथा प्रमाणपत्र देण्यात येऊ नये अशा सक्त सुचना आमदार सुनील शेळके यांनी संबधित अधिकाऱ्यांना दिल्या.




## गोविंदा आला रे आला...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**जुनी सांगवी :** अरविंद एज्युकेशन सोसायटीच्या लिटल फ्लॉवर प्री प्रायमरी स्कूल, लिटिल फ्लॉवर इंग्लिश मीडियम स्कूल, भारतीय विद्यानिकेतन विद्यालयात बालचमूंनी दहीहंडीचा आनंद लुटला.

### अरविंद एज्युकेशन सोसायटी प्रशालेत

# दहीहंडी उत्साही वातावरणात साजरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जुनी सांगवी :** राधा-कृष्णाच्या वेशातील चिमुकले... विविधरंगी फुलांनी सजवलेली दहीहंडी... विविध गाण्यांचा गजर... हंडी फुटल्यावर केलेला एकच जल्लोष... अशा उत्साही वातावरणात जुनी सांगवीतील अरविंद एज्युकेशन सोसायटीच्या लिटल फ्लॉवर प्री प्रायमरी स्कूल, लिटिल फ्लॉवर इंग्लिश मीडियम स्कूल, भारतीय विद्यानिकेतन विद्यालयात बालचमूंनी दहीहंडीचा आनंद लुटला. गोविंदा आला रे आला... यासारख्या गाण्यावर नृत्य करत ते दहीहंडी व कृष्णजन्माष्टमी उत्सवात सहभागी झाले होते. यामध्ये चिमुकल्यांसह शिक्षकही उत्साहाने सहभागी झाले होते.

संस्थेच्या अध्यक्षा आरती राव, सचिव प्रणव राव, लिटल फ्लॉवर स्कूलच्या मुख्याध्यापिका नीलम पवार, भारतीय विद्यानिकेतन च्या मुख्याध्यापिका आशा धोरपडे, लिटल फ्लॉवर प्री प्रायमरी स्कूलच्या मुख्याध्यापिका पिंकी मनिकम, पर्यवेक्षिका स्मिता बर्गे, शिक्षक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व कृष्ण पूजनाने झाली. विद्यार्थ्यांनी कृष्णभजन व पाळणा गीत' सादर केले. बालचमूंनी राधा - कृष्णाची आकर्षक वेशभूषा केली होती. शाळेच्या आवारातील दहीहंडी सर्वांचं लक्ष वेधून घेत होती. विद्यार्थ्यांनी सुंदर मनोरा बनवत 'मच गया शोर सारी नगरी रे', 'गोविंदा आला रे आला', 'बोल बजरंग बली की जय', या गाण्यावर ठेका धरत वातावरणात रंगत आणली. शिक्षकही यामध्ये सहभागी झाले होते.

### नदीकाठच्या रहिवाशांना सतर्क राहण्याच्या सूचना

# स्वतंत्र पथकाद्वारे नदीकाठच्या भागावर लक्ष

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहर परिसरात संततधार पाऊस सुरू आहे, शिवाय धरणातून होणाऱ्या पाण्याच्या विसर्गामध्ये वाढ होत असल्याने नदीकाठच्या रहिवाशांना महापालिकेच्या वतीने ध्वनिक्षेपकाद्वारे सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या जात आहेत. महापालिकेचे आपत्कालीन पथक अशा भागात प्रत्यक्ष गस्त घालीत असून कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी स्वतंत्र पथकाद्वारे दिवसरात्र नदीकाठच्या भागावर लक्ष ठेवले जात आहे. पिंपरी येथील महापालिका मुख्यालयात मध्यवर्ती तसेच क्षेत्रीय कार्यालयनिहाय २४ तास नियंत्रण कक्ष कार्यान्वित ठेवण्यात आले आहेत, अशी माहिती आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली.



सातत्याने पडणाऱ्या पावसाच्या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या आपत्कालीन यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. मुख्य रस्त्यांवर पाणी साचून दळणवळण व्यवस्थेवर त्याचा परिणाम होतो म्हणून क्षेत्रीय कार्यालयनिहाय स्वतंत्र पथक तैनात करण्यात आले असून त्यांच्याद्वारे सातत्याने पाहणी केली जात आहे.

चेंबरमध्ये कचरा अडकून पाणी तुंबू नये यासाठी आरोग्य पथकाची नेमणूक करण्यात आली आहे. पाणी साचलेल्या भागातील पाण्याचा निचरा करण्यासाठी त्या भागात तत्काळ पाणी उपसा यंत्रणा वाहन पाठवून आवश्यक कार्यवाही करावी, तुटलेले चेंबर तत्काळ दुरुस्त करावे, असे निर्देश आयुक्त शेखर सिंह यांनी दिले आहेत. रस्त्यांवर झालेले खड्डे बुजवावेत, तसेच रस्त्यांवरील खड्ड्यांबाबत आलेल्या तक्रारींवर तत्काळ कार्यवाही करण्याचे निर्देशदेखील आयुक्त सिंह यांनी प्रशासनाला दिले आहेत. हवामान खात्याच्या वतीने पुणे जिल्ह्यात रेड अलर्ट जारी करण्यात आला असून नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन देखील आयुक्त सिंह यांनी केले आहे.

दरम्यान, साथीच्या आजारांचा फैलाव होऊ नये यासाठी घरोघरी सर्वेक्षण करून आरोग्य तपासणी मोहीम राबविणे, धुरीकरण करणे, पावसामुळे शहरातील महत्त्वाच्या चौकांच्या ठिकाणी वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी पोलीस प्रशासनासमवेत योग्य समन्वय ठेवून आपत्कालीन परिस्थिती हाताळणे, आदी सूचना आयुक्त सिंह यांनी दिल्या आहेत.

## गणेशमूर्ती विसर्जनासाठी कृत्रिम हौद उभारून द्या

■ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** गणेशमूर्ती विसर्जनासाठी कृत्रिम हौद उपलब्ध करून द्यावेत, भूमिगत सांडपाणी वाहिन्या स्वच्छ कराव्यात, पावसामुळे पडलेले खड्डे बुजवावेत, ड्रेनेज कामासाठी खोदण्यात आलेले खड्डे बुजवून डांबरीकरण करावे, अशा सूचना जनसंवाद सभेत नागरिकांनी केल्या.

नागरिक आणि प्रशासन यांच्यात सुसंवाद राखण्यासाठी, तक्रारींचे निवारण जलदगतीने व्हावे यासाठी महिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या सोमवारी जनसंवाद सभेचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार महापालिकेच्या आठही क्षेत्रीय कार्यालयांमध्ये सोमवारी जनसंवाद सभा झाली. त्यात ८० नागरिकांनी तक्रारवजा सूचना मांडल्या. यात अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह क्षेत्रीय कार्यालयामध्ये अनुक्रमे १४, १२, ३, ६, ५, १६, १५ आणि नऊ नागरिकांनी सूचना मांडल्या. दरवर्षीप्रमाणे यंदाही पर्यावरणपूरक, नैसर्गिक रंग वापरून, पाण्यात सहज विरघळणाऱ्या शाडू मातीच्या मूर्तींची निर्मिती करावी. तसेच सर्व नागरिकांनी पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करावा, असे आवाहन करण्यात आले.

### आयुक्तांकडून सेवा रस्त्यांची पाहणी

# ताथवडे, पुनावळे चौकातील वाहतूक कोंडीवर निघणार तोडगा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** ताथवडे, पुनावळे चौकात सतत होणारी वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी आरक्षित रस्ते ताब्यात घेऊन रस्ते विकसित करावेत, रस्त्यावरील अतिक्रमण आणि वाहने देखील हटवण्यात यावीत, अशी मागणी ताथवडे- पुनावळे भागातील नागरिकांनी आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे केली होती. भुजबळ चौक, भूमकर चौक तसेच पुनावळे, ताथवडे चौकात होणारी सततची वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी उपाययोजनांबाबत महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी महामार्ग प्राधिकरण, पोलीस अधिकारी व लोकप्रतिनिधींसह या भागातील चौकाची व रस्त्यांची पाहणी केली.



शहर झपाट्याने वाढत असून ताथवडे, पुनावळे, रावेत, वाकड परिसराची देखील झपाट्याने वाढ झाली आहे. या परिसरात अनेक आयटी कंपन्या व मोठ्या रहिवासी सोसायटी आहेत. त्यातच हा परिसर हिंजवडी आयटी पार्कला लागून असल्याने नागरिक या परिसरात वास्तव्यास पसंती देत असून येथे नागरी वस्ती मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्यामुळे नागरिकांना वाहतुकीच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे.

त्यातच पुनावळे, ताथवडे, वाकड येथील सब वे अरुंद असून त्यात खड्डे पडलेले आहेत. तसेच या मुंबई- बंगळुरू हायवेलगत असणारा सर्व्हिस रस्ता देखील खड्डेमय झाला आहे. त्यामुळे शालेय विद्यार्थी, आयटी व औद्योगिक कामगार वर्ग, महिला, ज्येष्ठ नागरिक यांना वाहतुकीच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. महत्त्वाचे म्हणजे वाहतूक कोंडीत अनेक रुग्णवाहिका अडकतात अशा वेळी मोठा अनर्थ होण्याची शक्यता असते.

या त्रासामुळे परिसरातील अनेक कंपन्या व रहिवासी स्थलांतर करीत आहे ही खूप खेदजनक बाब आहे. सेवा रस्त्याचे डांबरीकरण करावे, अशी मागणी नागरिकांतून वारंवार होत आहे.

#रा

## राज्यभरात संताप : सरकारचे नौदलाकडे बोट

# शिल्पकार, कंत्राटदारावर पुतळा कोसळल्याने गुन्हा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मालवण** : नौदल दिनानिमित्त राजकोट किल्ल्यावर उभारण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा कोसळल्याच्या घटनेमुळे राज्यभरात संताप व्यक्त केला जात आहे. या प्रकरणी कंत्राटदार जयदीप आपटे आणि स्ट्रक्चरल कन्सल्टंट चेतन पाटील यांच्याविरोधात भारतीय न्याय संहितेच्या अनेक कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला. भ्रष्टाचार, फसवणूक आणि सार्वजनिक सुरक्षा धोक्यात आणणे आदी कलमांचा यात समावेश आहे.

१५ फूट उंचीचा चबुतरा आणि २८ फूट उंच शिवरायांचा पुतळा अशी येथील रचना होती. तारकर्लीच्या समुद्रकिनारी नौदल दिनाच्या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या पुतळ्याचे लोकार्पण झाले होते. पुतळा गेल्या आठ महिन्यांत पर्यटकांसह शिवप्रेमींचे आकर्षण केंद्र बनला होता. सोमवारी दुपारी अचानक तो कोसळल्याने साऱ्यांनाच धक्का बसला आहे. दरम्यान, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या तक्रारीनंतर एफआयआर नोंदवण्यात आला.

### शिल्पकार अनुभवी, ७ महिन्यात काम पूर्ण !

● हा पुतळा उभारण्याचे कंत्राट ठाण्यातील जयदीप आपटे या २५ वर्षांच्या तरुणाला देण्यात आले होते. त्याला फक्त दीड ते दोन फुटांचे पुतळे साकारण्याचा अनुभव होता. त्याने स्वतःच एका मुलाखतीत अशी माहिती दिली होती. इतका कमी अनुभव असलेल्या तरुण शिल्पकाराला शिवरायांचा इतका मोठा पुतळा उभारण्याचे कंत्राट का देण्यात आले, असा सवाल आता निर्माण झाला आहे. २८ फूट उंचीचा ब्रॉंझचा पुतळा बनविण्यास साधारण ३ वर्षांचा काळ लागतो. पण हा पुतळा जून २०२३ मध्ये बनविण्यास सुरुवात केली आणि तो डिसेंबर २०२३ पर्यंत म्हणजे अवघ्या सात महिन्यांमध्ये पूर्ण झाला, अशी माहिती जयदीपने मुलाखतीत दिली होती. शिवाजी महाराजांचा इतका मोठा पुतळा आपण उभारू शकतो की नाही, याबाबत त्याला साशंकता होती. त्याने मुलाखतीत म्हटले होते की, सगळं व्यवस्थित पार पडले तर सगळीकडे नाव होईल, पण जरा जरी चूक झाली तर सगळंच संपेल, असे वाटले; पण म्हटलं काय व्हायचं ते होऊ दे. संधी हातातून सोडायची नाही.

यामध्ये पुतळ्याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे असल्याचा दावा करण्यात आला आहे. संरचनेत वापरलेले नट आणि बोल्ट गंजलेले आढळले आहेत. पुतळा बनवताना वापरलेले स्टील गंजू लागले होते. पुतळ्याला गंज लागल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम खात्याने नौदलांच्या अधिकाऱ्यांना दिली होती, असे सिंधुदुर्गचे पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांनी सांगितले.

या पुतळ्याची उभारणी सार्वजनिक बांधकाम विभागाने केल्याचा दावा करत ठाकरे गटाचे आमदार वैभव नाईक यांनी मालवण येथील या विभागाच्या कार्यालयात जाऊन मोडतोड केली. मात्र, या पुतळ्याची जबाबदारी नौदलाकडे होती, असा दावा राज्य सरकारने केला आहे. पुतळ्याच्या संपूर्ण कामाची तसेच निगा राखण्याची जबाबदारी नौदलाची असल्याचा दावा पालकमंत्री चव्हाण यांनी केला.

पुतळा कोसळण्याची घटना दुर्दैवी आहे. पुतळ्याचा आराखडा व उभारणी नौदलाने केली होती. कोणालाही कायदा हातात घेण्याची गरज आणि अधिकार नाही. पुतळा पुन्हा दिमाखाने आणि अधिक मजबुतीने उभारला जाईल, असे आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहे.

**राज ठाकरे यांची खंत**

'पुतळा कोसळल्याची बातमी मनाला वेदना देणारी आहे.

## » Selected

### अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**कराड** : तालुक्यातील एका गावात अल्पवयीन मुलीवर दोघांनी अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी तालुका पोलिसात मंगळवारी पहाटे गुन्हा नोंद करण्यात आला असून पोलिसांनी एकास अटक केली आहे
विनोद विलास काटकर असे अटक केलेल्या तरुणाचे नाव आहे. अल्पवयीन मुलीवर गेल्या तीन वर्षांपासून एक अल्पवयीन मुलगा व विनोद काटकर यांनी वेळोवेळी अत्याचार केला. त्यातून ती गरोदर झाली. काटकर याने तिला गोळ्या खायला देऊन तिचा गर्भपात केला. अल्पवयीन मुलीने दिलेल्या फिर्यादीवरून काटकर व त्याचा अल्पवयीन साथीदार या दोघांविरोधात कराड तालुका पोलीस ठाण्यात पोक्सो अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

### 'मुख्यमंत्री शाळांमध्ये जाऊन पहारा देतील का?'

**मुंबई** : बदलापूर प्रकरण आणि विरोधकांच्या आरोपांवर भाष्य करताना शिंदे गटाचे नेते संजय गायकवाड यांनी, 'अशा प्रकारच्या घटना घडत असतात, आता काय मुख्यमंत्री राज्यातील शाळांमध्ये जाऊन पहारा देतील का?' असा प्रश्न उपस्थित केला आहे. त्यांच्या या विधानानंतर विविध राजकीय चर्चा सुरू झाल्या आहेत.
ते म्हणाले की, घटना दुर्दैवी आहे. हा गुन्हा करणारी एक विकृती आहे. पण विरोधक या घटनेवरून राजकारण करत आहेत. या घटनेला सरकारला जबाबदार धरत आहेत. पण आता काय मुख्यमंत्री राज्यातल्या सगळ्या शाळांमध्ये जाऊन पहारा देणार आहेत का? की पोलीस अधिक्षक त्यांच्या घरी जाऊन बसणार आहेत? आरोपी गुन्हा करण्यापूर्वी पोलिसांना फोन करून सांगतो का?" अशी पृच्छा त्यांनी केली. अशा घटनांचं राजकारण करण्यापेक्षा नराधमांना शिक्षा कशी मिळेल, यासाठी सर्वांनी प्रयत्न करायला पाहिजे, असे ते म्हणाले.

# लाडकी बहीणचे पैसे खात्यात ३१ ऑगस्टला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई** : राज्यातील महिलांना आर्थिक मदत म्हणून सुरु केलेल्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी ऑगस्ट महिन्यात अर्ज सादर करणाऱ्या महिलांच्या खात्यात ३१ ऑगस्टला पैसे पाठवले जाणार असल्याची माहिती राज्याच्या महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी दिली आहे.

महिलांच्या खात्यात दरमहा १५०० रु. प्रमाणे एका वर्षात १८ हजार रुपये पाठवले जाणार आहेत. योजनेची सुरुवात जुलैपासून करण्यात आली होती. जुलै आणि ऑगस्टचे तीन हजार रुपये जुलै महिन्यात अर्ज करणाऱ्या महिलांच्या खात्यात पाठवण्यात आले आहेत.

लाडकी बहीण योजनेचा दुसरा राज्यस्तरीय मेळावा नागपूरमध्ये ३१ ऑगस्टला होणार आहे. या माध्यमातून ऑगस्ट महिन्यात अर्ज दाखल केलेल्या महिलांच्या खात्यात जुलै आणि ऑगस्ट महिन्याचे तीन हजार रुपये पाठवण्यात येणार आहेत, अशी माहिती तटकरे यांनी दिली. ऑगस्ट महिन्यातील अर्जांची छाननी सुरु असून त्यांना ३१ ऑगस्टला पैसे मिळतील, असे तटकरे म्हणाल्या.

ऑगस्ट महिन्यात आलेल्या अर्जांनुसार नागपूरच्या कार्यक्रमात ४५ ते ५० लाख महिलांच्या खात्यात ३ हजार रुपये वर्ग केले जाणार आहेत. यापूर्वी पुण्यात पहिला राज्यस्तरीय निधी वितरण सोहळा पार पडला होता. त्यावेळी जुलै महिन्यात अर्ज सादर करणाऱ्या महिला अर्जदारांपैकी पात्र ठरलेल्या १ कोटी आठ लाख लाभार्थी महिलांच्या खात्यात तीन हजार रुपये वर्ग करण्यात आले होते.

योजनेसाठी नारी शक्ती एप मधून अर्ज दाखल करून घेतले होते. ते कपात न करता ते महिलांना द्यावेत, असे आदेश दिले होते.

### दमानियांची अजित पवार गटाला नोटीस

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई** : सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी राष्ट्रवादी अजित पवार गट आणि प्रवक्ते सुरज चव्हाण यांना मानहानीची नोटीस बजावली आहे.

दमानिया यांनी ट्विट करत याबाबत माहिती दिली आहे. त्यात म्हटले आहे की, राष्ट्रवादी अजित पवार गटाला व त्यांचे अधिकृत प्रवक्ते सुरज चव्हाण यांना मानहानीची नोटीस बजावली आहे. त्यांनी वाट्टेल ते वक्तव्य केलं. 'सुपारीबाज बाई', 'रिचार्जवर चालणारी बाई', कोणी अग्रवाल वकिलांकडून पैसे घेतले? त्यांच्या मुलांचा, नवऱ्याचा सगळा डिटेल्स देणार.

दमानिया त्यांच्या कुटुंबाबरोबर परदेशात फिरायला गेल्या होत्या. त्यांच्या या परदेशवारीवरून चव्हाण जोरदार टीका केली होती.

### शिवरायांच्या पुतळ्या प्रकरणी दोघांवर गुन्हा

**सिंधुदुर्ग** : नौदल दिनानिमित्त आठ महिन्यांपूर्वी उभारलेला मालवणमधील राजकोट येथील छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा कोसळला. या प्रकरणी दोन जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर या प्रकरणावर आता नौदलाने आपली भूमिका स्पष्ट केली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्याने दिलेल्या तक्रारीवरून जयदीप आपटे आणि डॉ. चेतन पाटील यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# स्वसंरक्षण शस्त्राने नको : अमृता फडणवीस

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई** : महिलांना स्वसंरक्षण आवश्यक आहे. पण, मी शस्त्र वापराच्या विरोधात आहे. तो यावरचा दीर्घकालीन उपाय ठरू शकेल, असे वाटत नाही. आपण तात्कालिक उपायाकडे न पाहाता दीर्घकालीन उपायाकडे पाहिले पाहिजे. समाज म्हणून अशा दानवी लोकांचा बहिष्कार करायला हवा. पोलिसांनी, सरकारने तातडीने कारवाई करावी, असे मत अमृता फडणवीस यांनी व्यक्त केले.

शिंदे गटाचे अमरावतीमधील ज्येष्ठ नेते, मुर्तिजापूरचे माजी नगराध्यक्ष नानकराम नेभनानी यांनी अमरावती येथे महिलांना स्वसंरक्षणासाठी रिवॉल्व्हर देण्याची मागणी केल्यानंतर त्याबाबत राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी ही प्रतिक्रिया दिली आहे.

सकल हिंदू समाजातर्फे मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नेभनानी यांनी हे विधान केले. तसेच, स्वसंरक्षणादरम्यान काही चांगली माणसं मारली गेली, तरी हरकत नाही, असेही ते म्हटल्याने त्यावरून चांगलीच चर्चा सुरू झाली आहे.

## उंच दहीहंडीचा : उत्साह शिगेला

# मुंबई, ठाण्यात 'थरथराट'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई** : मुंबई, ठाणे परिसरासह महाराष्ट्रात उंचच उंच दहीहंडी फोडण्यासाठी मंगळवारी विविध पथकांमध्ये जोरदार चुरस रंगली. थरावर थर रचले गेल्याने सायंकाळपर्यंत उत्साह शिगेला पोहोचला. लाखो रुपयांची पारितोषिके यासाठी लावण्यात आली होती.

मुंबईत दादरमधील आयडिअल, जांभोरी मैदान, घाटकोपर, आयसी कॉलनी या ठिकाणी मोठ्या दहीहंडी आहेत. तसेच संस्कृती युवा प्रतिष्ठान, मनसेची दहीहंडी, टेंबी नाका, स्वामी प्रतिष्ठान, संकल्प प्रतिष्ठान यांच्याही हंड्या उभारण्यात आल्या आहेत. मुंबई आणि ठाण्यात जवळपास एक हजार ३५४ दहीहंडी उत्सवांचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी गिनीज बुक वर्ल्ड रेकॉर्ड मोडणाऱ्या गोविंदा पथकाला २५ लाखांचे बक्षीस दिले जाणार आहे. तर ठाण्यात टेंभी नाक्याला मुख्यमंत्री शिंदेंची दहीहंडी असून बक्षिसाची रक्कम पुरुषांसाठी १ लाख ५१ हजार, महिलांसाठी १ लाख आहे. प्रकाश सुर्वे यांच्या दहीहंडीत १ लाख रुपयाच्या बक्षीसाची घोषणा करण्यात आली आहे.

थरावरुन कोसळल्याने काही गोविंदा जखमी झाले आहेत. या सर्व गोविंदांवर महापालिकेच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सुदैवाने यातील कोणालाही गंभीर दुखापत नाही. गोविंदांना तातडीने वैद्यकीय उपचार मिळावेत यासाठी मुंबईतील राज्य सरकारबरोबरच महानगरपालिकेची रुग्णालये सज्ज ठेवण्यात आली आहेत. गेल्या दोन वर्षात जखमी गोविंदांची संख्या २०० वर पोहचली आहे.




# राज्यव्यापी आंदोलनाचा तुपकर यांचा इशारा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**अमरावती** : शेतकऱ्यांची कर्जमुक्ती, पीक विमा, सोयाबीन आणि कापूस दरवाढीच्या मागण्यांसाठी राज्यव्यापी न भूतो न भविष्यति आंदोलन उभे करणार आहोत. त्यानंतर राज्यातील सत्ताधारी नेत्यांना फिरणं मुश्किल होईल, असा इशारा शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी माध्यमांशी बोलताना दिला.

सोयाबीन आणि कापसाच्या दरवाढीसाठी तुपकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा या शासकीय निवासस्थानी आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. त्यानंतर आता तुपकर यांनी पुन्हा एकदा राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा दिला आहे.

शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी द्या, हक्काचा पीक विमा द्या, सोयाबीन आणि कापसाचे दोन ते तीन वर्षापासून दर पडलेले असल्याने केंद्र सरकारशी चर्चा करून आयात आणि निर्यातीबाबत धोरण ठरवा, अशी आमची मागणी होती. मात्र, राज्य सरकारने आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केला. मला अटक केली. त्यानंतर आमच्या काही कार्यकर्त्यांनी गिरगाव चौपाटीवर आंदोलन केले, असा आरोप तुपकर यांनी सरकारवर केला. दोन ते चार दिवसांत आमच्या मागण्यांबाबत निर्णय घ्या. शेतकऱ्यांनी पक्ष, जात, धर्म बाजूला ठेवत शेतकरी म्हणून एकत्र या. जातीसाठी एकत्र येतो तर मग मातीसाठीदेखील एकत्र आले पाहिजे, असे तुपकर म्हणाले.

### तलावात आई व दोन मुलांचे मृतदेह

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बुलढाणा** : जिल्ह्यातील खामगाव तालुक्यात पिंप्री गवळी गावाजवळ एका पाझर तलावात आई आणि दोन चिमुकल्यांचे मृतदेह आढळल्याने एकच खळबळ उडाली आहे.

गावकऱ्यांना तलावातून प्रचंड दुर्गंधी येऊ लागली. तलावापाशी जाऊन पाहिले असता पाण्यावर एका महिलेसह दोन चिमुकल्यांचे मृतदेह तरंगताना आढळून आले. ही माहिती गावात पसरताच अनेक लोक तलावापाशी जमले. आईने आपल्या दोन चिमुकल्यांना स्वतःच्या शरीराला बांधलेल्या अवस्थेत मृतदेह सापडले. पार्वती प्रकाश इंगळे (वय ३०), आर्यन प्रकाश इंगळे (वय ८) आणि प्राची प्रकाश इंगळे (वय ६) अशी मृतांची नावे आहेत.

## भाजप-दादा गट सोडून तुतारी धरण्याची केली तयारी

# सोलापुरात अनेकांचा युतीला रामराम?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर** : विधानसभा निवडणुकीपूर्वी सोलापूर जिल्ह्यातील भाजप आणि अजित पवार राष्ट्रवादी गटातील अनेक नेते शरद पवार गटात जाण्याच्या तयारीत आहेत.

लोकसभा निवडणुकीत जिल्ह्यातील भाजपच्या दोन्ही जागा महाआघाडीने जिंकल्या होत्या. यामुळे आता विधानसभेला महायुतीतील अनेक विद्यमान आमदार व नेते महायुतीकडून निवडणूक लढविण्यास इच्छुक नसून या नेत्यांचा कल शरद पवार यांच्याकडे आहे. मनोज जरांगे यांच्या मराठा आरक्षण आंदोलनाचा फटका महायुतीला आणि प्रामुख्याने भाजपला बसणार याची जाणीव असल्याने अनेक नेते जरांगे यांची एकाबाजूला भेट घेत असून दुसऱ्या बाजूला शरद पवार यांच्या संपर्कात आहेत.

माढा विधानसभेसाठी भाजपचे विधान परिषद आमदार रणजीत सिंह मोहिते पाटील पवार गटाकडून निवडणूक लढविण्यास इच्छुक असल्याचे बोलले जाते. त्यांनी साथ सोडली तर भाजपला मोठा धक्का बसू शकतो. भाजपकडून तिकीट न मिळाल्याने त्यांचे बंधू धैर्यशील मोहिते पाटील शरद पवार गटाकडून माढ्याचे खासदार झाले आहेत.

### पंढरपूर मंगळवेढाविषयी उत्कंठा

● पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघात सध्या भाजपचे समाधान आवताडे आमदार असून आता या ठिकाणी माजी आमदार प्रशांत परिचारक निवडणूक लढवू इच्छितात. परिचारक शरद पवार यांच्या संपर्कात असून विधानसभेला तुतारी हाती घेऊ शकतात. परिचारक हे पूर्वाश्रमीचे शरद पवार गटाचेच असून स्वगृही परतण्याच्या तयारीत आहेत. पंढरपूरच्या माजी नगराध्यक्ष साधना भोसले या परिचारक गटाच्या असून त्यांनीही पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्याकडे पंढरपूर मंगळवेढासाठी उमेदवारी मागितली आहे.

### महायुतीची रणनीती काय?

● जिल्ह्यातील बहुतांश ग्रामीण मतदार संघात यावेळी शरद पवार यांची तुतारी हाती घेण्यासाठी महायुतीतील अनेक बडे नेते प्रयत्न करीत असल्याने भाजप आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादीकडून याचा कसा सामना केला जातो यावर राजकीय निरीक्षक लक्ष ठेवून आहेत.

माढ्याचे विद्यमान आमदार बबनदादा शिंदे देखील अजित पवार गटाला रामराम करून पुन्हा शरद पवार गटाकडून निवडणूक लढविण्यास इच्छुक आहेत. यासाठी आमदार शिंदे यांनी आपला मुलगा रणजीत सिंह शिंदे यांच्यासह अनेक वेळा पवार यांची भेट घेतली आहे. शरद पवार गटाकडून उमेदवारी न मिळाल्यास रणजीत सिंह अपक्ष म्हणून निवडणूक लढविण्याच्या तयारीत आहेत. माढ्यातूनच आमदार शिंदे यांचे पुतणे धनराज शिंदेही काकाच्या विरोधात बंड करून उमेदवारी मागत आहेत.

विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अभिजीत पाटील विधानसभेला भाजपला सोडचिठ्ठी देत माढा किंवा पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघातून शरद पवार गटाकडून निवडणूक लढविण्यास इच्छुक आहेत.

#रा

## श्रीलंकेत दोन्ही देशांचे नौदल दाखल

# भारत-चीन आमनेसामने

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** हिंदी महासागर क्षेत्र हे चीन आणि भारत यांच्यातील नवे सामरिक क्षेत्र बनताना दिसत आहे. भारतीय युद्धनौका श्रीलंकेतील कोलंबो येथील बंदरात पोहोचली आणि त्याचवेळी चीनच्या तीन युद्धनौकाही तेथे आल्या. भारताने चीनच्या युद्धनौका, गुप्तहेर नौका आणि पाणबुड्या श्रीलंकेत राहण्यावर यापूर्वीच आक्षेप नोंदवला आहे.

भारतीय नौदलाचे आयएनएस मुंबई हे जहाज श्रीलंकेच्या तीन दिवसांच्या दौऱ्यावर सोमवारी कोलंबो बंदरात दाखल झाले. विशेष म्हणजे चिनी नौदलाच्या तीन युद्धनौकाही कोलंबो बंदरात दाखल झाल्या. भारतीय नौदलाचे 'मुंबई' हे जहाज तीन दिवसांच्या श्रीलंकेच्या दौऱ्यावर आहे, अशी माहिती श्रीलंकेच्या नौदलाने दिली आहे. आयएनएस मुंबई हे १६३ मीटर लांबीची युद्धनौका असून, त्यात ४१० कर्मचारी आहेत, अशी माहिती भारतीय उच्चायुक्तालयाने रविवारी दिली. श्रीलंकेतील बंदरावर हे जहाज पोहोचण्याची ही पहिलीच वेळ आहे, अशी माहिती उच्चायुक्तालयाने दिली.

दरम्यान, चीनच्या पीपल्स लिबरेशन आर्मीच्या (पीएलए) नौदलाच्या तीन युद्धनौका ही फेई, वुझिशान आणि किलियानशान कोलंबो बंदरात औपचारिक भेटीसाठी दाखल झाल्याची माहिती श्रीलंकेच्या नौदलाने दिली. ही फेई ही १४४.५० मीटर उंचीची फ्रिगेट असून त्यात २६७ क्रू मेंबर्स आहेत, वुझिशान ही २१० मीटर उंचीची फ्रिगेट असून, त्यात ८७२ क्रू मेंबर्स आहेत आणि किलियानशान ही ३३४ क्रू मेंबर्ससह २१० मीटर उंचीची फ्रिगेट आहे.

हिंद महासागरात चीनची वाढती उपस्थिती ही भारतीय नौदलासाठी काळजीचा भाग आहे. चीनचा या प्रदेशातील मुक्त संचार रोखणे, हे भारतासमोरील आव्हान असेल, असे संरक्षण तज्ज्ञांनी म्हटले आहे.

२१ सप्टेंबर रोजी होणाऱ्या श्रीलंकेच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. भारताच्या बाजूने असणारे, रानिल विक्रमसिंघे हे चीनला पाठिंबा देणाऱ्या नॅशनल पीपल्स पॉवरचे अनुरा कुमार दिसानायके यांच्यापेक्षा प्रभावी कामगिरी करू शकतात, असे मानले जाते.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## फास्टॅग नाही, जीएनएसएस येणार

### टोलचा टोला

**फास्टॅगचे युग** आता संपलेले असून, जीएनएसएस या नव्या प्रणालीतून सरकार त्यात बदल करण्याच्या तयारीत असल्याचे वृत्त आहे. जीएनएसएस म्हणजे ग्लोबल नेव्हिगेशन सॅटेलाईट सिस्टीम, ज्याचा उल्लेख केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनीही केला आहे. सध्या ही यंत्रणा चाचणीच्या टप्प्यात असल्याचे बोलले जात आहे. भविष्यात येणारे जीएनएसएस नेव्हिगेशन उपग्रह प्रणालीवर आधारित असेल. यात सॅटेलाईट बेस्ड युनिट असेल, जे ट्रेनमध्ये बसवण्यात येणार आहे. या मदतीने महामार्गाचा वापर केव्हा सुरू झाला, याचा मागोवा अधिकाऱ्यांना घेता येणार आहे. वाहन टोलरोडवरून निघताच ही यंत्रणा रोड वापराचा हिशोब करून रक्कम वजा करणार आहे. विशेष म्हणजे याच्या मदतीने प्रवाशांनी जेवढा प्रवास केला आहे, तेवढेच पैसे मोजावे लागणार आहेत. या मदतीने प्रवाशांना रोड वापराची नेमकी रक्कम कळू शकणार असून, त्याप्रमाणे पैसे भरता येणार आहेत. तसेच पारंपरिक टोलनाकेही हटविण्यात येणार आहेत. सरकारने याबाबत निश्चित तारीख जाहीर केलेली नसली, तरी देशातील दोन प्रमुख महामार्गांवर त्याची चाचणी सुरू आहे. यामध्ये कर्नाटकातील बेंगळुरू-म्हैसूर राष्ट्रीय महामार्ग (एनएच-२७५) आणि हरियाणातील पानिपत-हिसार राष्ट्रीय महामार्ग (एनएच-७०९) यांचा समावेश आहे. त्यानंतर टप्प्याटप्प्याने त्याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.




» Selected

## निर्देशांकांत अल्पशी वाढ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मंगळवारी, अस्थिरतेदरम्यान भारतीय शेअर निर्देशांक सपाट बंद झाले. निर्देशांक १३.६५ अंकांनी वधारून ८१,७११.७६ वर, तर निफ्टी ७.२० अंकांनी वधारून २५,०१७.८० वर बंद झाला. सुमारे २,०३६ समभाग वाढले, १,७४६ समभाग घसरले आणि ८६ समभाग अपरिवर्तित राहिले. निफ्टीमध्ये एसबीआय लाइफ इन्शुरन्स, मारुती सुझुकी, बजाज फिनसर्व्ह, श्रीराम फायनान्स आणि एचडीएफसी लाइफ यांचे समभाग वधारले, तर एचयूएल, जेएसडब्ल्यू स्टील, टायटन कंपनी, टाटा मोटर्स आणि ग्रासिम इंडस्ट्रीज चे समभाग घसरले. सेक्टोरल फ्रंटवर ऊर्जा, धातू आणि एफएमसीजी ०.५-१ टक्क्यांनी घसरले, तर बँक, कॅपिटल गुड्स, हेल्थकेअर, आयटी, रियल्टी, फार्मा, मीडिया ०.२-४ टक्क्यांनी वधारले.

## ममतांच्या राजीनाम्याची मागणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोलकाता :** पश्चिम बंगालमध्ये मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या राजीनाम्यासाठी मोठ्या प्रमाणात विद्यार्थी रस्त्यावर उतरले आहेत. त्यांना रोखण्यासाठी पोलीस देखील मोठ्या प्रमाणात तैनात करण्यात आले आहेत. हावडा ब्रिजवरून पुढे येऊ पाहणाऱ्या आंदोलनकर्त्यांवर वॉटर कॅननचा मारा करण्यात येत आहे. असे असताना विद्यार्थी आंदोलनावर ठाम आहेत. हावडा ब्रिज बंद करण्यात आले आहे. ब्रिजवर लोखंडाचे बॅरिकेड्स लावण्यात आले आहेत. आंदोलनकर्त्यांना हटवण्यासाठी पोलीस बळाचा वापर करत आहेत. विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज करण्यात आला. त्यामुळे काही विद्यार्थ्यांनी दगडफेक केल्याचे देखील पाहायला मिळाले. आतापर्यंत अनेक आंदोलनकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

### पाच दिवस अपॉइंटमेंट नाही

# पासपोर्ट कार्यालय बंद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**नवी दिल्ली :** नवीन पासपोर्ट घेण्यासाठी जाणाऱ्यांसाठी महत्त्वाची बातमी आहे. आता पासपोर्ट बनवण्यासाठी ५ दिवसांची अपॉइंटमेंट मिळणार नाही. पासपोर्ट विभागाचे पोर्टल २९ ऑगस्ट रोजी रात्री ८ वाजल्यापासून २ सप्टेंबरच्या सकाळपर्यंत देशभरात बंद राहणार आहे.

यापूर्वी अपॉइंटमेंटसाठी ३० ऑगस्ट ते २ सप्टेंबर या कालावधीत तारिख मिळालेली असल्यास, ती दुसऱ्या तारखेला बदलावी लागणार आहे. केवळ दिल्लीच नव्हे, तर देशभरातील अर्जदारांना अडचणींना सामोरे जावे लागू शकते. या कालावधीत नवीन अर्ज करता येणार नाहीत.

तांत्रिक कारणांमुळे हे पोर्टल पाच दिवस काम करू शकणार नाही, अशी माहिती पासपोर्ट विभागाकडून देण्यात आली आहे. याचा परिणाम केवळ पासपोर्ट सेवा केंद्राच्या कामकाजावरच होणार नाही, तर प्रादेशिक पासपोर्ट कार्यालय, अर्जदारांची पोलिस पडताळणी आणि परराष्ट्र मंत्रालयावरही परिणाम होणार आहे. पासपोर्टसाठी ऑनलाइन अपॉइंटमेंट घेणाऱ्या अर्जदारांना पासपोर्ट विभागाने यापूर्वीच याची माहिती दिली आहे.

**अर्जदारांना फटका बसणार**

पासपोर्ट विभागाचे पोर्टल बंद झाल्याने दिल्लीसह अन्य राज्यातील अर्जदारांनाही अडचणींचा सामना करावा लागू शकतो. पासपोर्ट विभागाच्या अधिकाऱ्याने सांगितले की, या कालावधीत ऑनलाइन अपॉइंटमेंट घेतलेले अर्जदार या पदासाठी पात्र आहेत. यापुढे तो दुसऱ्या तारखेला तारीख ठरवू शकणार आहे. त्यांना नव्याने नियुक्ती करावी लागणार नाही. मात्र, या कालावधीत लोकांना नवीन अपॉइंटमेंटसाठी अर्ज करता येणार नाही.

## श्रीलंकेने ८ भारतीय मच्छीमारांना पकडले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रामनाथपुरम :** श्रीलंकेच्या नौदलाने मंगळवारी पहाटे रामेश्वरम येथील आठ भारतीय मच्छीमारांची मासेमारी नौका पकडली.

रामेश्वरम येथून सुमारे ५०० यांत्रिक नौका सोमवारी समुद्रात उतरल्या, तर काही मासेमारी नौका श्रीलंकेच्या सागरी हद्दीत घुसल्या. अटक करण्यात आलेल्या मच्छीमारांना आणि बोटीला मन्नार बंदरात नेण्यात येत असून पुढील तपासासाठी त्यांना मत्स्य व्यवसाय विभागाच्या अधिकाऱ्यांच्या ताब्यात देण्यात येईल. श्रीलंकेने आतापर्यंत ४६ भारतीय ट्रॉलर आणि ३४१ भारतीय मच्छीमार जप्त केले आहेत. मच्छीमार संघटनांनी श्रीलंकेच्या कारवाईचा निषेध केला असून सरकारने त्यांच्या सुटकेसाठी प्रयत्न करावेत, अशी मागणी केली आहे.

# मियाँ मुस्लिमांना ताबा घेऊ देणार नाही

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**गुवाहाटी :** आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्वा सरमा यांनी 'मियाँ' मुस्लिमांना आसामचा ताबा घेऊ देणार नाही, असे म्हटले आहे. नागाव येथे १४ वर्षीय मुलीवर झालेल्या बलात्काराच्या पार्श्वभूमीवर राज्यातील कायदा व सुव्यवस्थेबाबत विरोधी पक्षांनी मांडलेल्या स्थगन प्रस्तावाला उत्तर देताना सरमा विधानसभेत बोलत होते. लोकसंख्या वाढ आटोक्यात ठेवली असती, तर गुन्हेगारीचे प्रमाण वाढले नसते, असेही त्यांनी सुनावले.

विरोधी पक्षातील काही नेत्यांनी मुख्यमंत्र्यांवर पक्षपातीपणाचा आरोप केला असता, ते म्हणाले, मी पक्षपाती असेन. खालच्या आसामचे लोक वरच्या आसाममध्ये का जातील? जेणेकरून मियाँ मुस्लिमांनी आसामचा ताबा घ्यावा? आम्ही असे होऊ देणार नाही, असे सरमा यांनी ठणकावले.

जोरदार वाद झाल्यामुळे, सत्ताधारी आणि विरोधक दोघांनी सभागृहात गोंधळ घातला आणि सभापती बिश्वजित दैमारी यांना सभागृहाचे कामकाज १० मिनिटांसाठी तहकूब करावे लागले. काँग्रेस, एआययूडीएफ आणि माकपचे आमदार आणि एकमेव अपक्ष सदस्य अखिल गोगोई यांनी राज्यातील महिलांवरील गुन्ह्यांसह वाढत्या गुन्ह्यांमुळे उद्भवलेल्या परिस्थितीवर चर्चा करण्यासाठी स्थगन प्रस्ताव मांडला होता.

मियाँ मुसलमानांना परदेशी मुसलमान म्हणतात. आसाम सरकारने पाच मुस्लीम समुदायांना मूळ मुस्लिमांचा दर्जा दिला आहे. यात गोरिया, मोरिया, सोलाह, देसी आणि सय्यद यांचा समावेश आहे. त्याचबरोबर ब्रह्मपुत्रेच्या काठावर स्थायिक झालेल्या मुस्लिमांना मियाँ मुस्लिमांचा दर्जा देण्यात आला आहे. बंगाली भाषिक स्वदेशी मुसलमान नाहीत, असे म्हटले जाते.

## राष्ट्रीय हरित लवादाची नोटीस

# इंदूरमध्ये जलप्रदुषण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**इंदूर :** राष्ट्रीय हरित लवादाने (एनजीटी) इंदूरच्या सांवर रोड औद्योगिक क्षेत्रातील पर्यावरणाच्या समस्येप्रकरणी पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय, मध्य प्रदेश राज्य भूजल प्राधिकरण, मध्य प्रदेश प्रदूषण नियंत्रण मंडळ (एमपीपीसीबी) आणि केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ (सीपीसीबी) यांच्यासह अनेक प्राधिकरणांना नोटीस बजावली आहे. परिसरातील हातपंप व बोअरवेलमधून धोकादायक रित्या प्रदूषित, लाल रंगाचे पाणी सोडले जात असल्याचे आढळून आले आहे.

एनजीटीने हा मुद्दा अधोरेखित करणाऱ्या माध्यमातील वृत्ताची दखल घेत, ही कारवाई केली आहे. अध्यक्ष प्रकाश श्रीवास्तव यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठ, न्यायिक सदस्य न्यायमूर्ती अरुण कुमार त्यागी आणि तज्ज्ञ सदस्य डॉ. ए. सेंथिल वेल यांनी परिस्थितीच्या तीव्रतेवर भर दिला.

एमपीपीसीबीने सादर केलेल्या अहवालानुसार, बाधित भागातील भूजलात सल्फेट, केजेल्डल नायट्रोजन आणि मॅग्नेशियमचे घातक प्रमाण आहे. कुमेडी, बरदरी, धनखेडी, साखरखेडी आणि निरंजनपूर या गावांसह ५३ ठिकाणी केलेल्या नमुन्यांमध्ये एकूण विरघळलेल्या घन पदार्थांची (टीडीएस) पातळी २,००० ते ३,६०० मिलीग्राम/लीटर पर्यंत चिंताजनक असल्याचे आढळले, जे ६०० मिलीग्राम/लीटरच्या सुरक्षित मर्यादेपेक्षा खूप जास्त आहे.

## चंपाई सोरेन यांचा ३० तारखेला भाजपप्रवेश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी सोमवारी झारखंडचे माजी मुख्यमंत्री चंपाई सोरेन ३० तारखेला भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याची घोषणा केली. रांची येथे त्यांचा भाजप प्रवेश होणार आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासोबत सोरेन यांच्या भेटीचे छायाचित्र त्यांनी पोस्ट केले असून, झारखंड विधानसभा निवडणुकीसाठी भाजपचे सहप्रभारी सरमा हे देखील या बैठकीचा भाग होते. नेतृत्वावर अवमान केल्याचा आरोप त्यांच्यावर केला गेला होता.

## युक्रेनवर मारा

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**कीव :** रशियाने सलग दुसऱ्या दिवशी युक्रेनवर क्षेपणास्त्रे, ड्रोनचा मारा केला. यात युक्रेनचे मोठे नुकसान झाले.

# जन्माष्टमीनिमित्त देशभरात २५ हजार कोटींहून अधिक व्यवसाय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

> जन्माष्टमीसारखे सण हे सनातनच्या अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा भाग असून, देशाची अर्थव्यवस्था मजबूत करतात. या महत्त्वपूर्ण सणादरम्यान, विशेषत: फुले, फळे, मिठाई, देवता वेशभूषा, सजावटीच्या वस्तू, उपवासाच्या मिठाई, दूध, यांची मोठ्या प्रमाणात विक्री झाली. दही, लोणी आणि सुका मेवा यांना विशेष मागणी होती -**प्रवीण खंडेलवाल** खासदार सीएआयटीचे राष्ट्रीय सरचिटणीस

**नवी दिल्ली :** आज देशभरात जन्माष्टमीचा सण मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला. देशभरात मंदिरे सजवली गेली आणि लोकांनी त्यांच्या घरातील मंदिरे आणि प्रार्थनास्थळेही सुंदरपणे सजवली. कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स (CAIT) च्या म्हणण्यानुसार, जन्माष्टमीनिमित्त देशभरात २५ हजार कोटी रुपयांचा व्यवसाय झाला, अशी माहिती महाराष्ट्र राज्य कॉन्फडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स कॅटचे अध्यक्ष सचिन निवंगुणे यांनी दिली.

CAIT चे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. B.C. भरतीया यांनी नमूद केले की जन्माष्टमी देशभरात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली, विशेषत: उत्तर आणि पश्चिम भारतात, जिथे हा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. मंदिरे आकर्षकपणे सजवली गेली होती आणि त्यांना भेट देण्यासाठी लोकांची मोठी गर्दी होती. त्यांनी अधोरेखित केले की जन्माष्टमी उत्सवाच्या विशेष आकर्षणांमध्ये डिजिटल टॅबल्स, भगवान कृष्णासोबत सेल्फी पॉइंट्स आणि इतर अनेक आनंददायक दृश्यांचा समावेश आहे. शहरांमध्ये संत आणि ऋषींची असंख्य भजने, धार्मिक नृत्ये आणि प्रवचन होते. विविध सामाजिक संस्थांनीही मोठ्या प्रमाणात जन्माष्टमी साजरी केली.

# मोदी-बायडेन यांच्यात चर्चा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बायडेन यांच्याशी दूरध्वनीवर बांगलादेश आणि युक्रेनमधील परिस्थितीवर चर्चा केली. बांगलादेशातील हिंदूंच्या सुरक्षेच्या प्रश्नाचाही याच समावेश होता.

पंतप्रधान मोदी यांनी एक पोस्ट करून याबाबत माहिती दिली, ते म्हणाले की, मी राष्ट्राध्यक्ष बायडेन यांच्याशी दूरध्वनीवर बोललो. आम्ही बांगलादेशातील परिस्थितीवर चर्चा केली आणि परिस्थिती लवकर पूर्वपदावर आणणे, तसेच तेथील हिंदूंची सुरक्षा सुनिश्चित करण्यावर भर दिला, असे त्यांनी सांगितले.

बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना ५ ऑगस्ट रोजी ढाका सोडून गेल्यानंतरही: हिंदूंच्या हिंसाचाराच्या घटना सातत्याने घडत आहेत.

मंदिरांची तोडफोड करण्यात आली असून, एका हिंदू नगरसेवकाची हत्याही करण्यात आली. अनेक शिक्षकांना राजीनामे देण्यास भाग पाडले गेले आहे. ही परिस्थिती अद्याप कायम आहे.

### राजस्थानातील प्रकार उघडकीस, सुदैवाने अनर्थ टळला

# वंदे भारतचा अपघात टळला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**जयपूर :** राजस्थानमध्ये वंदे इंडिया ट्रेन उलटण्याचे षडयंत्र आखण्यात आले होते, असे उघड झाले आहे. पाली येथे अहमदाबाद-जोधपूर वंदे इंडिया एक्स्प्रेस सिमेंट ब्लॉकला धडकल्यानंतर हा प्रश्न उपस्थित झाला आहे. रुळावर सिमेंटचा स्लॅब कोणी आणि का ठेवला याचा शोध पोलिस घेत आहेत. सुदैवाने कोणतीही दुर्घटना घडली नाही. मात्र, दुसऱ्या दिवशी त्याच ठिकाणी सिमेंटचे ब्लॉक आढळून आले आहेत.

उत्तर पश्चिम रेल्वेचे सीपीआरओ शशी किरण यांनी सांगितले की, वंदे भारत सिमेंट ब्लॉकला धडकली. गाडी येथे काही काळ थांबवावी लागली. या घटनेत कोणीही जखमी झाले नाही. सुमेरपूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत ही घटना घडली. याप्रकरणी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, ट्रॅकवर सिमेंट ब्लॉक ठेवण्यात आला होता. फूटपाथ तयार करण्यासाठी त्यांचा वापर केला जातो. त्याचा आकार बराच मोठा होता. त्याचे वजन सुमारे ५ किलो असल्याचे सांगण्यात आले.

२४ ऑगस्ट रोजी एकाच ठिकाणी सिमेंटचे दोन मोठे ब्लॉक ठेवण्यात आले होते. मात्र, दुसऱ्या दिवशी सायंकाळी गाडी येण्यापूर्वीच सिमेंटचे ब्लॉक पाहून रुळावरून हटविण्यात आले. सलग दोन दिवस ट्रॅकवर सिमेंटब्लॉक टाकल्यानंतर प्रशासनाने संपूर्ण विभागाची तपासणी तीव्र केली आहे. ट्रॅक मॉनिटरिंग वाढवण्यात आले आहे.

अलीकडच्या काळात अनेक रेल्वे अपघात झाले असून, काही घटनांमध्ये घातपाताचा कट असल्याची शक्यता आहे.

### जम्मू काश्मिरमध्ये दहशतवादी, फुटीरतावादी मोठ्या संख्येने

# अफझल गुरुचा भाऊ निवडणूक रिंगणात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** संसदेवर हल्ला करणाऱ्या अफझल गुरू या दहशतवाद्याचा भाऊ एजाज अहमद गुरू जम्मू-काश्मिरमध्ये विधानसभा निवडणूक लढवत असल्याचे धक्कादायक वृत्त आहे. अनेक दहशतवादी तसेच फुटीरतावादी विधानसभा निवडणुकीत उभे राहणार आहेत.

लोकसभा निवडणुकीत पंजाबमधील दोन जागांवर अमृतपाल सिंह यांच्यासह दोन फुटीरतावादी खासदार निवडून आले होते. काँग्रेस, आप, भाजप आणि अकाली दलासह अनेक प्रमुख पक्ष रिंगणात असताना फुटीरतावाद्यांनी निवडणुका का जिंकल्या, याबाबतही चिंता व्यक्त करण्यात आली. पंजाबच्या धर्तीवर जम्मू-काश्मीरमधील अनेक दहशतवादी आणि फुटीरतावादीही निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहेत. त्यांनी सोमवारी एकत्र येऊन तहरीक-ए-अवाम या नव्या पक्षाच्या स्थापनेची घोषणा केली..

जम्मू-काश्मीरमध्ये फुटीरतावादी रशीद इंजिनीअर यांनी लोकसभा निवडणुकीत उमर अब्दुल्ला यांचा पराभव केला. तहरीक-ए-अवाममध्ये सामील झालेल्या अनेकांचे म्हणणे आहे की, इंजिनीअरचे यश पाहूनच आम्ही हा पक्ष स्थापन केला आहे. तहरीक-ए-अवामशी संबंधित प्रमुख व्यक्तींपैकी एक म्हणजे अफझल गुरूचा भाऊ एजाज अहमद गुरू. अफझल गुरूला २००१ मध्ये संसदेवर झालेल्या हल्ल्याप्रकरणी २०१३ मध्ये फाशी देण्यात आली होती.

श्रीनगरच्या तुरुंगात शिक्षा भोगत असलेल्या सर्जन बरकती याचेही नाव चर्चेत आहे. हिजबुल मुजाहिदीनचा कमांडर बुरहान वानी ठार झाल्यानंतर दगडफेकीच्या घटना घडवून आणल्याचा त्याच्यावर आरोप आहे. काश्मिरी पीड पाइपर म्हणून ओळखला जाणारा बरकती ऑगस्ट २०२३ पासून तुरुंगात आहे. यानंतर नोव्हेंबरमध्ये त्याची पत्नीही टेरर फंडिंग प्रकरणात अडकली होती. त्यांची मुलगी बरकती यांची उमेदवारी जाहीर करू शकते, अशी चर्चा आहे. महत्त्वाची बाब म्हणजे हे फुटीरतावादी खोऱ्यातील अनेक जागांवर नॅशनल कॉन्फरन्स आणि काँग्रेससारख्या मोठ्या पक्षांना धक्का देऊ शकतात.

बारामुल्लाचे खासदार रशीद सध्या दिल्लीच्या तिहार तुरुंगात आहेत. त्यांनी आपल्या मुलांच्या माध्यमातून प्रचार केला आणि निवडणुकीत ४.७ लाख मते मिळवली. तेव्हापासून फुटीरतावाद्यांना असे वाटते की, खोऱ्यात मुख्य प्रवाहातील कोणत्याही राजकीय पक्षाऐवजी फुटीरतावादी घटकांकडे जाऊ शकणारे मत आहे. यामुळे या लोकांनी पक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेतला.

#रा

